POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक  कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-०३ ● मुंबई, रविवार, ३ ऑगस्ट २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## तब्बल १७७ दिवसांनी मुंबईतील चारकोपच्या राजाचे विसर्जन; कोर्टाच्या कचाट्यात अडकलेल्या बाप्पा आज मार्गस्थ

■**मुंबई । प्रतिनिधी,**

गणेशोत्सव आणि मुंबईकरांचे व महाराष्ट्रातील गणेशभक्तांचे वेगळेच नाते आहे. त्यामुळे, दरवर्षी गणेशोत्सवासाठी भाविकांची मोठी गर्दी, उत्साह आणि झगमगाट मुंबईत पाहायला मिळते. मुंबईतील गणेशमूर्ती हे अवघ्या महाराष्ट्राचं, देशभरातली गणेशभक्तांचं आकर्षण असतं. कारण, उंचच उंच आणि भल्या मोठ्या आकाराच्या गणेशमूर्ती सर्वांचे लक्ष वेधतात. मुंबईत लागबागचा राजा असेल किंवा अनेक गणेश मंडळं असतील येथील विसर्जन मिरवणुका म्हणजे पर्वणीच असते. मात्र, गेल्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती विसर्जनला बंदी असल्याने गेल्या १७७ दिवसांपासून विसर्जनाच्या प्रतिक्षेत असलेल्या चारकोपच्या राजाचे आज विसर्जन होत आहे. अखेर, न्यायालयाकडून




मंडळाला बाप्पांच्या समुद्रातील विसर्जनासाठी परवानगी मिळाल्याने भक्तांमध्ये उत्साह आहे. त्याच पार्श्वभूमीवर धानुकर वाडी येथील तलावात चारकोपच्या राजाचे विसर्जन होत आहे.

पोओपी म्हणजेच 'प्लास्टर ऑफ पॅरिस'च्या गणेशमूर्तींच्या नैसर्गिक स्थळांवर विसर्जनास मज्जाव करण्यात आल्याने माघी गणेशोत्सवातील 10 दिवसांच्या बाप्पाच्या विसर्जनाचे काय होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, 'चारकोपचा राजा' मंडळाचा अपवाद वगळता अन्य मंडळांनी मंगळवारी कृत्रिम तलावातच मूर्तीचे विसर्जन केले. चारकोपच्या राजाचे विसर्जन करण्यात न आल्याने तेव्हापासून येथील गणपती बाप्पा विसर्जनाच्या प्रतिक्षेत होते. 'या वर्षीचे गणपती विसर्जन आम्ही तूर्त स्थगित केले असून, पुढील निर्णय होईपर्यंत आमच्या राजाचे व्यवस्थित जतन करू', असे 'चारकोपचा राजा' मंडळाचे मानद अध्यक्ष निखिल गुढेकर यांनी सोशल मीडियावरुन जाहीर केले होते. तसेच, गणेशमूर्ती मंडपातच ठेवण्याचा निर्णय या मंडळाने घेतला होता. मात्र, गणेशोत्सवाच्या महिन्यातच मंडळाने विसर्जन करण्याचा निर्णय घेतल्याने बाप्पा आजच विसर्जनासाठी मार्गस्थ झाले आहेत.

उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे गेल्या १७७ दिवसांपासून मंडपातच विराजमान राहिलेल्या मुंबईच्या कांदिवलीतील चारकोपच्या राजाचे आज विसर्जन होत आहे. गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताा चारकोपचा राजा आज १७७ दिवसांनी विसर्जनासाठी मार्गस्थ झाला आहे. या विसर्जनामागे एक खूप मोठा संघर्ष आहे, कारण ६ महिन्यांपासून कोर्टात अडकलेला बाप्पा आता विसर्जनासाठी निघाला. त्यामुळे, विसर्जन मिरवणुकीसाठी मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते सहभागी झाले आहेत. गुलाल उधळत, ढोल-ताशांच्या गजरात या बाप्पाचं विसर्जन करण्यात येत आहे.

**नियोजित दौऱ्यामुळे राज ठाकरे येऊ शकले नाहीत**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या माजी नगरसेविका शुभदा गुडेकर यांनी राज ठाकरे यांची भेट घेत विसर्जनसाठी येण्याची विनंती केली होती. चारकोपचा राजा गणपतीचे विसर्जन करण्यात येत असल्याचे पार्श्वभूमीवर हे निमंत्रण देण्यात आले होते. विसर्जन आरतीनिमित्ताने गणप्पती बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी येण्याची विनंती शुभदा गुडेकर यांनी केली होती. मात्र, रायगड येथे नियोजित दौरा असल्यामुळे आपण येऊ शकत नाही, असे राज ठाकरे यांनी सांगितले होते.

## ५०० जणांविरुद्ध गुन्हा दाखल, १७ जणांना अटक, कलम १६३ लागू...



■**पुणे । प्रतिनिधी,**

पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यामधील यवत गावात शुक्रवारी एका सोशल मीडिया पोस्टमुळे उसळलेल्या जातीय हिंसाचार संदर्भात पोलिसांनी आतापर्यंत ५०० हून अधिक लोकांविरुद्ध पाच एफआयआर दाखल केले आहेत. हिंसाचार आणि जाळपोळीच्या घटनांप्रकरणी १७ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे, तर आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या तरुणाला देखील अटक करण्यात आली आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, शुक्रवारी दुपारी एका तरुणाने सोशल मेसेजिंग प्लॅटफॉर्मवर आक्षेपार्ह पोस्ट टाकल्यानंतर गावात जातीय तणाव पसरला. यामुळे संतप्त झालेल्या लोकांनी तोडफोड करायला सुरुवात केली, दरम्यान अनेक वाहने आणि सार्वजनिक मालमत्तेची हानी केली. घटनेदरम्यान, हल्लेखोरांनी मोटारसायकल, दोन कार, धार्मिक स्थळ आणि बेकरीचे नुकसान केले आणि आग लावली. पोलिसांनी तात्काळ परिस्थिती नियंत्रणात आणली आणि गावात शांतता प्रस्थापित झाली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना अश्रूधुराचा आणि लाठीचार्ज चा वापर करावा लागला. पीटीआय या वृत्तसंस्थेच्या म्हणण्यानुसार, यवत पोलिस ठाण्याच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, आतापर्यंत हिंसाचाराशी संबंधित पाच गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापैकी चार गुन्हे हिंसाचार, जाळपोळ आणि मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या ५०० हून अधिक लोकांविरुद्ध दाखल आहेत. त्यापैकी १०० हून अधिक जणांची ओळख पटली आहे आणि १७ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. धार्मिक भावना दुखावणारी पोस्ट टाकणाऱ्या तरुणाविरुद्ध एफआयआर देखील दाखल करण्यात आला आहे आणि त्याला अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी सांगितले. त्याने शेअर केलेला मजकूर दुसऱ्या राज्यातील एका घटनेवर आधारित होता.

कलम १४४ आणि एसआरपीएफ तैनात

पुण्याचे पोलिस अधीक्षक संदीप सिंग गिल म्हणाले की, सुरुवातीच्या तपासात कोणताही पूर्वनियोजित कट रचल्याचे दिसून आले नाही. गावातील परिस्थिती आता नियंत्रणात आहे. मोठ्या संख्येने पोलिस दल आणि राज्य राखीव पोलिस दल (एसआरपीएफ) तैनात करण्यात आले आहे. बीएनएसच्या कलम १४४ आणि बीएनएसएसच्या कलम १६३ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. असे त्यांनी पुढे माहिती दिली. अतिरिक्त पोलिस अधीक्षक गणेश बिरादार म्हणाले, गावावर ड्रोनद्वारे लक्ष ठेवले जात आहे आणि सोशल मीडियावरील क्रियाकलापांवरही विशेष लक्ष दिले जात आहे.

**'कठोर कारवाई केली जाईल': मुख्यमंत्री**

पुणे दौंड दौऱ्यावर असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घटनेचा निषेध करत म्हणाले, ₹मध्य प्रदेशातील एका घटनेशी संबंधित एका हिंदू पुजारीबद्दल एका तरुणाने आक्षेपार्ह पोस्ट केली, ज्यामुळे गावात संताप निर्माण झाला. काही लोक जाणूनबुजून अशा पोस्ट करून तणाव पसरवू इच्छितात. त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही गावाला भेट दिली आणि पोस्ट टाकणारा तरुण नांदेडचा रहिवासी आणि रोजंदारीवर काम करणारा असल्याचे सांगितले जाते.

## दादरमधील कबूतर खाना हटवणार
## कोर्टाच्या आदेशानंतर पालिका करणार कारवाई, स्थानिकांचा मात्र विरोध

■**मुंबई । प्रतिनिधी,**

कबुतरांच्या विष्ठेमुळे आणि पिसांमुळे आरोग्यास गंभीर धोका निर्माण होतो, असे कारण देत पालिकेला शहरातील कबुतरखाना बंद करण्याचे निर्देश राज्य सरकारने दिले होते. मात्र दादर येथील कबूतर खान्यात पक्ष्यांना खाद्य घालण्यासाठी मनाई असताना देखील खाद्य कसे घातले जाते असा संतप्त सवाल न्यायालयाने उपस्थित केला होता. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने नाराजी व्यक्त केली होती, लोकांकडून न्यायालयीन आदेश धुडकावत कबूतरांना खाद्य घातलेच कसे जावू शकते? असा प्रश्न देखील न्यायालयाने पालिका प्रशासनाला विचारला होता. न्यायालयाच्या या नाराजीनंतर दादर पश्चिम येथील कबूतर खान्यावर जाळी टाकण्यासाठी पालिकेकडून रात्रीच्या वेळी काम हाती घेण्यात आले होते, मात्र कबूतर खान्यावर जाळी टाकण्याच्या कामाला स्थानिकांनी




विरोध दर्शवला. शुक्रवारी रात्री मुंबईतील प्रसिद्ध आणि ऐतिहासिक ठिकाण असलेल्या दादर पश्चिम येथील कबूतर खान्यावर जाळी टाकण्यासाठी पालिकेकडून काम सुरु झाले.

मात्र कबूतर खान्यावर जाळी टाकण्याच्या कामाला स्थानिकांकडूंन विरोध करण्यात आला. महापालिकेच्या वतीने कारवाई करताना स्थानिकांकडूंन विरोध केला व महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व पोलिसांशी चर्चा करावी व आम्हाला कबूतर खाण्याची व्यवस्था करण्यासाठी वेळ द्यावी अशी मागणी करण्यात आली. कबूतर खाण्यावरील कारवाई पुढे ढकलण्यात यावी यासाठी महापालिकेला नागरिकांकडून पत्र देखील देण्यात आले. तसेच एवढ्या रात्री कारवाई करायला का आलात ? असा सवाल उपस्थित करुन नागरिकांनी पालिकेला कारवाई करण्यास मनाई केली.

**काय म्हणाले होते न्यायालय?**

कबूतरखान्यातील कबूतरांच्या समूहामुळे नागरिकांच्या आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे. असे असतानाही काही व्यक्तींनी बेकायदेशीरपणे कबूतरांना खाद्य देणे सुरू ठेवले आहे.

जनतेला कबूतरांचा त्रास होणार नाही याची पालिकेने काळजी घ्यावी.

न्यायालयीन आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या तसेच जीवघेणा आजार पसरवण्यास हातभार लावणाऱ्या नागरिकांविरोधात गुन्हा दाखल करा.

## सहा महिन्यांच्या चिमुकलीचे अपहरण, दीड लाख रुपयांना विक्री, पोलिसांनी आरोपींना ठोकल्या बेड्या



■**छत्रपती संभाजीनगर**

सहा महिन्यांच्या चिमुकलीचे अपहरण करुन हैदराबादमधील व्यापाऱ्याला दीड लाख रुपयांत विक्री करणाऱ्या टोळीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरमधील पोलिसांनी ही कारवाई केली आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी शोध करत आरोपींना जेरबंद केलं आहे. जाणून घेऊयात याबबत सविस्तर माहिती. गुजरातमधील अहमदाबादच्या ढोलका परिसरातून सहा महिन्यांच्या मुलीचे अपहरण करुन हैदराबादमधील व्यापाऱ्याला दीड लाख रुपयांत विक्रीचा सौदा ठरला होता. मुलीचे अपहरण केल्यावर आरोपी छत्रपती संभाजीनगर मार्गे रेल्वेने हैदराबादला निघाले होते. सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक तपासातून आरोपी महाराष्ट्राच्या दिशेने निघाल्याचे निष्पन्न होताच गुजरात पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर पोलिसांशी संपर्क साधून माहिती दिली. त्यानंतर छत्रपती संभाजीनगरचे पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी तत्काळ गुन्हे शाखेच्या पथकाला कारवाईच्या सूचना केल्या. त्यानंतर पथक तातडीने रेल्वेस्थानकावर पोहोचले. सीसीटीव्ही फुटेजच्या वर्णनावरून आरोपी मनीषा, बिमलसोबत जयेशही मिळून आला. त्यानंतर चिमुकलीला ताब्यात घेत सर्वांना अटक करण्यात आली आहे.

## अमली पदार्थांच्या तस्करीप्रकरणी नायजेरियन नागरिकाला अटक

■**वसई। प्रतिनिधी,**

नालासोपरायात अमली पदार्थांची तस्करी करणाया एका नायजेरियन नागरिकाला अटक करण्यात आली आहे. यावेळी त्याच्याकडून १८ लाख ४३ हजारांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. तुळींज पोलिसांकडून ही कारवाई करण्यात आली. नालासोपारा शहरात मोठ्या प्रमाणावर नायजेरियन देशाचे नागरिक बेकायदेशीरित्या वास्तव्य करत आहेत. यातील अनेक नागरिक अमली पदार्थांच्या व्यवहारात सहभागी असल्याचे उघड होऊ लागले आहे.नुकताच नालासोपारा पूर्वेच्या सेंट्रल पार्क परिसरात एक व्यक्ती अमली पदार्थांच्या विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक राहुल फड यांना मिळाली होती. याबाबत पोलिसांनी तपास करत चुक्वू एमेका जॉन पॉल (४८) या नायजेरियन नागरिकाला अटक केली. यावेळी त्याच्याकडून ९ लाख ५२ हजार किंमतीचे मेफेड्रॉन (एम. डी.), ८ लाख ९१ हजार किंमतीचे एमडी नावाचा अमली पदार्थ असा एकूण १८ लाख ४३ हजारांचा माल जप्त करण्यात आला. पॉल हा मूळचा नायजेरियन असून नवी मुंबईच्या खारघर येथे वास्तव्यास होता. त्याच्या विरोधात तुळींज पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.ही कारवाई परिमंडळ २ च्या पोलीस उपायुक्त पूर्णिमा चौगुले श्रींगी, तुळींज विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त उमेश माने-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय जाधव, पोलीस निरीक्षक आनंद पेडणेकर, बाळासाहेब बनकर, पोलीस उपनिरीक्षक राहुल फड, आणि पोलीस शिपाई आजिनाथ गिते आदींच्या पथकाचे केली.

## वसई विरार मनपाच्या माजी आयुक्तांनंतर आणखी एका बड्या अधिकाऱ्यावर ED ची धाड


■**मुंबई । प्रतिनिधी,**

वसई विरारचे महापालिकेचे महापालिकेचे माजी आयुक्त अनिल कुमार यांच्यावर एऊ नं काही दिवसांपूर्वीच धाड टाकली होती. हे प्रकरण अद्याप ताजं आहे. त्यानंतर वसई-विरार शहर महानगरपालिकेतील नगररचना विभागाचे निलंबित उपसंचालक वाय. एस. रेड्डी यांच्याविरुद्ध बेहिशेबी संपत्तीप्रकरणी अखेर भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने कारवाई केली आहे. आचोळे पोलीस ठाण्यात त्यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १३ (१)(ब) सह १३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या तक्रारीवरून करण्यात आली



असून, तपासाअंती रेड्डी यांच्याकडे कोट्यवधींची बेहिशेबी मालमत्ता असल्याचे स्पष्ट झाले होते. याअंतर्गत एऊने यापूर्वी वसईतील तसेच हैदराबाद येथील निवासस्थानी छापे टाकून तब्बल २३ कोटी २५ लाख ४० हजार रुपयांचे हिरे-जडजवाहीर आणि ८ कोटी ३२ लाख रुपयांची रोकड हस्तगत केली होती.तपासानुसार, रेड्डी यांनी वसई विरार महानगरपालिकेमध्ये कार्यरत असताना आपल्या पदाचा गैरवापर करून मोठ्या प्रमाणात संपत्ती मिळवली होती. त्यांच्याकडे आढळलेली संपत्ती ही त्यांच्या अधिकृत उत्पन्नाच्या स्त्रोतांपेक्षा अत्यंत जास्त असल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. ही संपत्ती मिळवताना त्यांनी भ्रष्ट मार्गांचा वापर केला असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, या प्रकरणी पुढील तपास ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अपर पोलीस अधीक्षक संजय गोविलकर, उपअधीक्षक दत्ताराम कराडे व तपासी अधिकारी रविंद्र परुळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. तक्रारदाराच्या तक्रारीवरून आणि चौकशीअंती आज दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी अधिकृत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी लवकरच रेड्डी यांच्यावर कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे.

## धक्कादायक! मुंबई क्क्ळ मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्याची आत्महत्या, हॉस्टेलवरून उडी मारत संपवलं आयुष्य



■**मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबईमधील पवईमधील IIT मुंबईमध्ये एका विद्यार्थ्यानें आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. IITमधील हॉस्टेल इमारतीवरून उडी घेऊन विद्यार्थ्यानें आत्महत्या केली. रोहित सिन्हा (२६) असं या विद्यार्थीचें नाव आहे. रोहित आयआयटी मुंबईत मेटा सायन्सच्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेत होता. रोहितने नैराश्यातून आयुष्य संपवल्याचे बोललं जातंय.

काय घडलं नेमकं?

IIT मुंबईमध्ये ही घटना शुक्रवारी रात्री घडली. रोहितच्या मृत्यूने आयआयटी परिसरात शोककळा पसरली आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. रोहित हा हॉस्टेलच्या टेरेसवरून खाली पडला आणि जागीच त्याचा मृत्यू झाला. पोलिसांना प्राथमिक तपासात आत्महत्येची शक्यता वाटत असली, तरी अन्य कारणांचाही शोध घेतला जात आहे. घटनास्थळी कोणतीही सुसाइड नोट आढळली नाही. पोलिसांनी रोहितच्या मित्रांचे आणि हॉस्टेलमधील सहकाऱ्यांचे जबाब नोंदवण्यास सुरुवात केली आहे. तसेच, सीसीटीव्ही फुटेज आणि फॉरेन्सिक तपासणीद्वारे घटनेचा तपशील जाणून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. आयआयटी प्रशासनाने या घटनेबद्दल खेद व्यक्त केला असून, रोहितच्या कुटुंबियांना संपर्क साधण्यात आला आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला असून शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. प्राथमिक माहितीनुसार, रोहित सिन्हा हा विद्यार्थी IIT मुंबईमध्ये शिक्षण घेत होता. शैक्षणिक दबावामुळे त्याने हे टोकाचे पाऊल उचलले असावे, असा पोलिसांचा अंदाज आहे. ही घटना शुक्रवारी मध्यरात्री घडली असून, पवई पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पोस्टमार्टमसाठी सरकारी रुग्णालयात पाठवला आहे. आत्महत्येचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिस रोहित सिन्हाचा मोबाइल, खोलीतील कागदपत्रे आणि इतर वस्तूंची तपासणी करत आहेत. या आधीही आयआयटीमध्ये अशा प्रकारच्या अनेक दुर्दैवी घटना घडल्या आहेत.पोलिसांकडून अधिकृत माहिती येणे बाकी असून, शिक्षणसंस्थेने या घटनेवर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर विशेष लक्ष देण्याची गरज यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित झाली आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# बोटावर निभावलं!

जीवावर बेतलेलं अखेर बोटावर निभावलं' म्हणून राज्याचे नूतन क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी गुरुवारी रात्री सुटकेचा निःश्वास टाकला असेल. नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सभागृहात बसले असताना कोकाटे यांनी आपल्या मोबाइलवर पत्त्यांचा डाव उघडला आणि करमणूक म्हणून 'वाईच' दोन-चार खेळ्या केल्या. त्या नेमक्या प्रेक्षक गॅलरीतून फोनच्या कॅमेऱ्याने कोणीतरी टिपल्या. त्यावरून बराच गदारोळ झाला. कोकाटेंच्या जागी दुसरा कोणी असता, तर विषय एवढा चिघळला नसता. पण, कोकाटे हे व्यक्तिमत्त्वच कोणी हलक्यात घ्यावं असं नाही. त्यामुळे, सगळ्यांनीच त्यांना गांभीयार्ने घेतलं आणि कोकाटे फसत गेले. विषय खोलात जातोय याचं भान कोकाटेंना फार उशिरा आलं. केवळ या प्रकरणातच असं नाही, स्वतःच्याच मिजाशीत वावरायची सवय असलेल्या कोकाटेंबाबत हे नेहमीच होतं. अगदी युवक काँग्रेसच्या दिवसांपासून त्यांच्यासोबत राहिलेले राजकीय नेते आणि कार्यकर्ते हेच सांगतात. हे सरकार आल्यापासून कोकाटे मंत्रिमंडळात आहेत. याचं कारण यावेळच्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी आपला मतदारसंघ त्यांच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना देऊ केला म्हणून. पवार यांनी या निवडणुकीत पारंपरिक बारामती मतदारसंघाऐवजी ज्या मतदारसंघांचा विचार केला होता, त्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील काही मतदारसंघांबरोबरच नाशिक जिल्ह्यातील सिन्नर विधानसभा मतदारसंघाचाही समावेश होता. सिन्नरची हवा जोखण्यासाठी त्यांनी या मतदारसंघात त्यावेळी लागोपाठ दौरेही केले होते. पवार यांच्या त्या मनसुब्याचे कोकाटे यांनी स्वागतच केलं होतं. आपल्या हातातला मतदारसंघ पवार यांच्यासाठी सोडण्याची बिनशर्त तयारी दाखवल्याने साहजिकच कोकाटे यांच्या गुणांत वाढ झाली. त्यातूनच त्यांचा मंत्रिमंडळ प्रवेश नक्की झाला! जे मनात असेल ते बोलून टाकण्यात कोकाटे मागेपुढे पाहात नाहीत. राजकारणात हा गुण बहुधा अडचणीचाच ठरतो. त्यामुळे, मंत्रिमंडळात आल्यानंतरही कोकाटे यांनी आपल्या पूर्वीच्याच लौकिकात अधिक भर टाकण्यास सुरुवात केल्यानंतर ते चांगलेच अडचणीत आले. त्यासाठी त्यांना पक्षप्रमुखांकडून खडे बोलही ऐकावे लागले. मुख्यमंत्र्यांनी उघड नाराजी व्यक्त करून झाली. पण म्हणतात ना, 'मारणाऱ्याचा हात धरता येतो, बोलणाऱ्याचं तोंड कसं धरणार?' अगदी तशीच गत कोकाटे यांच्याबाबतही झाली. 'शेतकरी भिकारी नाही. मला तसं म्हणायचं नव्हतं. माज्या विधानाचा विपर्यास झाला' असा खुलासा करताना कोकाटे यांनी 'शेतकरी कसला भिकारी? सरकार भिकारी' असा खुलासा करून स्वतःलाच आगीतून फुफाट्यात नेऊन टाकलं'! त्याचा धुरळा खाली बसत नाही तोवर हे पत्त्यांचं प्रकरण समोर आलं. त्यातही खुलासा करताना 'बुडत्याचा पाय खोलात' अशीच गत झाली. 'मोबाइल सुरू करताना रमीचा डाव 'पॉप-अप' झाला' या त्यांच्या खुलाशानंतर विधिमंडळाने केलेल्या तपासात त्यांच्या मोबाइलवर रमीचा डाव किती वेळ चालला होता इथपासून त्यांच्या या क्रीडानंदाचे चित्रीकरण कुठून केलं गेलं? इथपर्यंत सगळ्याच बाबी उघड झाल्या. यावेळीही केवळ तेच अडचणीत आले नाहीत. त्यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रवक्ते, पवार - असे सगळेच अडचणीत आले. त्या सगळ्यांनीच अगदी कठोर प्रतिक्रिया दिल्या. त्यावरून 'कोकाटे यांची गच्छंती नक्की' अशा प्रकारच्या बातम्याही काही अतिउत्साही माध्यमांनी चालवल्या. पण, तसं घडणं अवघड होतं. कारण, त्याचवेळी अन्यही काही मंत्र्यांच्या तशाच वादग्रस्त बाबी सुरू होत्या. त्यांच्यावर शिस्तभंगाची किंवा औचित्यभंगाची कारवाई होण्याची चिन्हे नव्हती. जर त्यांच्यावर कारवाई नाही, तर एकट्या कोकाटेंवरच कारवाई कशी होणार? राजकारणातली गणितं आणि समीकरणं अशीच वेगळी असतात. त्यामुळे, कोकाटे वाचले. केवळ खाते बदलावर, शिक्षा म्हणून कमी महत्त्वाचं खातं स्वीकारून कोकाटेंनी स्वतःची मान सोडवून घेतली, असंच चित्र बाहेर आहे. कोकाटे यांचं विधिमंडळाच्या सभागृहातलं गैरवर्तन केवळ रमी खेळण्याचं आहे, की सभागृहात मोबाइल वापरण्याचं आहे? सदस्यांच्या सभागृहातल्या हालचालींचं अशा प्रकारे चित्रण करणं गंभीर नाही का? या मुद्द्यांचा ऊहापोह अजूनतरी कुठे नीट झालेला दिसत नाही. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह विधिमंडळ प्रशासन आणि सभागृहालाही याचा विचार करावा लागेल. सभागृहाचे संकेत, परंपरांचं उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी खुद्द सभागृहात सुरू असतातच. त्यात सभागृहाच्या शिस्तीचा, सभागृहातील वर्तनाचा मुद्दाही विचारात घ्यावा लागणार आहे. सदस्यांनी; अनेकदा मंत्र्यांनीही एकमेकांना दिलेले 'तोंडात गुळणी धरण्याचे पदार्थ' वाहिन्यांच्या पडद्यावर दिसत असतात. सभागृहात असताना सदस्यांनी मोबाइलचा वापर करणं, काहीतरी चघळत राहाणं, प्रेक्षक सज्जातून प्रेक्षकांनी चित्रीकरण करणं, विविध गॅलऱ्यांत सुरू असलेल्या 'फ्री स्टाईल' हालचाली - या सगळ्या बाबी विधिमंडळाचं गांभीर्य घालवणाऱ्या आहेत. फार पूर्वी याबाबत पिठासीन अधिकारीच अत्यंत कडक आणि आग्रही असत. पिठासीन अधिकाऱ्यांच्या या पावित्र्यामुळे विधान भवनाची सुरक्षा यंत्रणाही अत्यंत सजग असे. प्रेक्षक सज्जातील एखादा प्रेक्षक खुर्चीत पायावर पाय टाकून बसला, वार्ताहर गॅलरीतला एखादा वार्ताहर सभागृहात बोलणारा सदस्य कोण आहे, हे पाहण्यासाठी आपल्या बाकावरून वाकला, तरी सुरक्षा रक्षकाकडून त्याला जागीच ताकद दिली जात असे. गॅलरी प्रवेशिका असूनही संकेतभंग करणाऱ्यांना सुरक्षा रक्षकांनी अनेकदा गॅलऱ्यांतून बाहेर काढलेलं आहे! विधिमंडळाची प्रतिष्ठा कायम राखण्यासाठी अशा प्रकारचा आग्रह असायला हवा. तशी शिस्त लावायला हवी. ती असेल, तर कोणाचीच विधिमंडळात बसून कोणतंही आक्षेपार्ह वर्तन करण्याची हिंमत होणार नाही.

# विद्यार्थ्यांसाठी शेतीविषयक अभ्यास दौरे असावेत

देशातील शेतीविषयक अभ्यास करताना विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन शेतीकामाचा अनुभव घेणे फार महत्त्वाचे असते. आजही आपल्या देशात शेती हेच उदरनिवार्हाचे प्रमुख साधन असल्याने मानवी जीवनात शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तेव्हा पुस्तकात शेतीच्या धड्यांचा अभ्यास करीत असताना शेतात जाऊन काम केल्याने विद्यार्थ्यांना शेतीविषयक अधिक माहिती मिळते. यामध्ये नांगरणी, तरवा पेरणे, तरवा काढणे, रोव पेरणे, लावणी लावणे, कापणी करणे व झोडणे इत्यादी कामे करावी लागतात. तेव्हा सध्या पावसाळा सुरू आहे. शेतीची कामेसुद्धा सुरू असून कोकणात भात लावणी चालू आहे. तशी वेगवेगळ्या प्रकारची शेतीसुद्धा केली जाते. अशावेळी विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रत्यक्ष शेतीकामाचा अनुभव घेण्यासाठी अभ्यास दौरे शैक्षणिक संस्थांनी आयोजित करावेत. जेणेकरून त्यांच्या ज्ञानात अधिक भर पडून शेतीक्षेत्राची अधिक गोडी निर्माण होण्याला मदत होईल. त्यासाठी विद्यार्थ्यांचे शेतीविषयक अभ्यास दौरे आयोजित करण्यात यावेत. शाळेबरोबर शेतातसुद्धा शेती हंगामात शाळा भरवली पाहिजे. भारत हा शेतीप्रधान देश आहे. जरी पुस्तकातून शेतीचे धडे शिकविले गेले तरी प्रत्यक्षात शेती कशी केली जाते हे जवळून पाहता यावे तसेच प्रत्यक्ष शेतात काम करून एक नवीन अनुभव विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी विद्यार्थ्यांचे शेतीविषयक अभ्यास दौरे आयोजित करण्यात यावेत. म्हणजे प्रत्यक्ष काम केल्याचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळून त्यांना त्यांच्या ज्ञानात अधिक भर पडू शकते. तेव्हा सध्या पावसाळी शेतीची कामे सुरू आहेत. पाऊससुद्धा बऱ्यापैकी शेती योग्य लागत आहे. यात चिखलात नांगरणी, पेरणी, लावणी यांचा प्रत्यक्षात अनुभव मिळू शकतो. महत्त्वाची बाब म्हणजे, शेतात काम केल्याचे विशेष समाधान मिळेल. याचा चांगला परिणाम शेतात प्रत्यक्ष काम केल्याने शेतीविषयक कामाची त्यांच्या ज्ञानात अधिक भर पडणार आहे. शेतीच्या बांधावर जाऊन शेतीची पाहणी करण्यापेक्षा वाफ्यात जाऊन चिखलात लावणी लावल्यामुळे त्याचा अनुभव संदर्भ पुस्तकाच्या पलीकडचा असतो. सध्या भात लावणीची कामे कोकणात जोरात चालू आहेत. तेव्हा विद्यार्थ्यांना शेतीविषयक लागवडीची माहिती घेण्यासाठी शेती हंगामात विद्यार्थ्यांचे अभ्यास दौरे आयोजित करायला हवेत. यातून विद्यार्थ्यांना शेतीची आवड निर्माण होण्याला मदत होईल. ही समाधानाची बाब आहे. आजही शेतकरी ग्रामीण भागात पारंपरिक पद्धतीने शेती करतात. जर विद्यार्थ्यांना अशा अभ्यास दौऱ्यातून शेतीचे ज्ञान मिळाल्यास त्याचा फायदा ते आपल्या घरच्या शेतीत उत्तमप्रकारे बदल करून अधिक उत्पादन घेऊ शकतात. हे फक्त आपल्याला अनुभवातून मिळते. तसेच विद्यार्थ्यांना शेतकरीदादा यांचे शेतीविषयक मौलिक विचार व मार्गदर्शन मिळू शकतात. महत्त्वाची बाब म्हणजे, सध्या पावसाळी शेती हंगाम सुरू झाल्याने विद्यार्थ्यांना पुस्तकातून शेतीचे धडे शिकविताना आता प्रत्यक्ष अनुभव येण्यासाठी अभ्यास दौरे करावेत. म्हणजे भाताची लावणी कशी करण्यात येते याची विद्यार्थ्यांना कल्पना येते. त्या आधी तरवा कसा काढायचा हे प्रत्यक्षात अनुभवता येते. लावणीसाठी चिखल कसा तयार केला जातो याचे वाफ्यातील चिखलाचे निरीक्षण करून पाहू शकतो. त्यासाठी नांगरणी कशी केली जाते, याची माहिती मिळते. सध्या बऱ्याच ठिकाणी नांगरणी ट्रॅक्टरने केली जात आहे. सध्या क्वचित बैलांचे जोत बांधून नांगरणी केल्याचे पाहायला मिळते. बैलांच्या साहायाने केलेली नांगरणी अधिक गलगलीत होत असते. तशी ट्रॅक्टरने होत नाही. याचा चांगला परिणाम चिखलात लावणी लावताना बोटाला सहसा इजा होत नाही. त्यामुळे अधिक उत्साहाने भाताची लावणी लावली जाते. शेती हंगामातील अभ्यास दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रत्यक्षात वाफ्यातील चिखलात लावणी लावल्याचा अनुभव येईल. बऱ्याच वेळा शेतीची कामे पूर्ण झालेली असतात. त्यावेळी शेतीच्या बांधावर जाऊन शेतीचा अभ्यास केला जातो. तेव्हा असे न करता आता पावसाळा ऋतू चालू आहे. यावर्षी पावसाळा ऋतू चालू होण्यापूर्वी वरुणराजाचे जोरात आगमन झाले होते. आतासुद्धा समाधानकारक पाऊस लागत आहे. त्यामुळे कोकणात नांगरणी करून भात पेरण्यात येऊन आता तरवा काढून चिखल करून लावणी लावण्यात येत आहे. अशावेळी शाळेतील मुलांना प्रत्यक्ष लावणी कशी लावली जाते याचा अनुभव येण्यासाठी शेतीला अनुसरून धडे असतील अशा मुलांचे अभ्यास दौरे आता काढावेत.

# विदर्भात भाजपने फुंकले निवडणुकांचे रणशिंग




सेवाग्रामला झालेल्या या एकदिवसीय मेळाव्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वांनाच मार्गदर्शन केले. त्यावेळी तुम्ही पक्षाला खड्ड्यात घालू बघाल तर पक्ष तुम्हाला खड्ड्यात घातल्याशिवाय राहणार नाही असा सज्जड दम देखील भरला. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका या आपल्याला महायुतीतच लढवायच्या आहेत हे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. त्याचबरोबर जर स्थानिक स्तरावर काही ठिकाणी युती होऊ शकली नाही, तर होणाऱ्या मैत्रीपूर्ण लढतीत मित्रपक्षांवर टीका करणे टाळा हे देखील त्यांनी कार्यकर्त्यांना स्पष्ट केले. भाजप हा सर्वात मोठा पक्ष राहील हे देखील त्यांनी सांगून मित्र पक्षांना टोला देखील लगावला.

राज्यात भाजपची सत्ता आल्यावर विदभार्चा कसा विकास घडवून आणला, याची साद्यंत माहिती देत अजूनही विकासाच्या काय काय योजना आहेत हे फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना समजावून सांगितले. त्याचबरोबर या सर्व योजना तुम्ही जनसामान्यांपर्यंत पोहोचवा आणि विदर्भ आता मागास राहणार नाही हे लोकांना समजावून सांगा असेही त्यांनी कार्यकर्त्यांना सुचित केले. गतकाही वर्षात सिंचनासाठी युती सरकारने कुठे कुठे आणि किती पैसा आणला आहे याची माहिती देत भविष्यात आता विदर्भ दुष्काळी भाग राहणार नाही हे देखील त्यांनी स्पष्ट केले. एकूणच सेवाग्राममध्ये जाऊन फडणवीस यांनी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे विदर्भात रणशिंग फुंकले असे म्हणता येईल.

### ग्रँडमास्टर दिव्या देशमुख नागपुरात दाखल

सोमवारी संध्याकाळी नागपूरच्या दिव्या देशमुखने जॉर्जियामध्ये सुरू असलेल्या महिला विश्वकरंडक बुद्धिबळ स्पर्धेचे अजिंक्यपद मिळवल्याची बातमी आली आणि नागपुरात आनंदाची लाट पसरली. विदर्भ कन्या असलेली दिव्या ही नागपूरच्या शंकर नगर परिसरात निवासाला असलेल्या डॉ. जितेंद्र देशमुख आणि डॉ. नम्रता देशमुख या दाम्पत्याची मुलगी आहे, तर राज्य लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष आणि अमरावती विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. के. जी. देशमुख यांची नात आहे. दिव्या ग्रँडमास्टर बनल्याची बातमी येताच तिच्या चाहत्यांनी शंकर नगर येथील तिच्या निवासस्थानी एकच गर्दी केली. तिचे वडील डॉ. जितेंद्र आणि आजीचे सर्वांनी अभिनंदन केले. बुधवारी रात्री दिव्याचे जॉर्जियाहून नागपूरला आगमन झाले. त्यावेळी नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर नागपूरकरांतर्फे तिचे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी नागपूरचे माजी महापौर दयाशंकर तिवारी यांनी तिचे पुष्पहार घालून स्वागत केले. यावेळी नागपूर जिल्हा बुद्धिबळ असोसिएशनचे गिरीश व्यास, महाराष्ट्र बुद्धिबळ असोसिएशनचे अध्यक्ष आमदार परिणय फुके, माजी राज्यसभा सदस्य अजय संचेती, बुद्धिबळ पटू सच्चिदानंद सोमण यांच्यासह अनेक मान्यवर मोठ्या संख्येत उपस्थित होते. विमानतळावर दिव्याचे भव्य स्वागत केल्यावर ढोल-ताशांच्या गजरात उघड्या जीपवर उभे करून तिची विमानतळ ते शंकर नगरातील देशमुखांचे निवासस्थान अशी भव्य मिरवणूकही काढण्यात आली. यावेळी ढोल-ताशांचा गजर आणि फटाक्यांच्या कडकडाटाने परिसर दुमदुमून गेला होता. दिव्याचा नागपूरकरांतर्फे शनिवारी स्थानिक सुरेश भट सभागृहात भव्य सत्कार करण्यात येणार असून या समारंभाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रवृत्ती मान्यवर उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी दिली आहे. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आता लवकरच होणार हे निश्चित झाले. त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष आपापली रणनीती ठरवून कामाला लागलेले दिसतात. भारतीय जनता पक्षाने विदभार्तील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांची रणनीती ठरवण्यासाठी गेल्या सोमवारी वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम येथे चरखा सभागृहात विदर्भस्तरीय पदाधिकाऱ्यांचा मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महसूल मंत्री चंद्रकांत चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, अशोक उईके, पंकज भोयर, तसेच आकाश फुंडकर हे इतर वैदर्भीय मंत्री, आमदार, खासदार आणि पदाधिकारी या मेळाव्यात सहभागी झाले होते. विदर्भात ११ जिल्हा परिषदा, तर चार महानगरपालिका आहेत. याशिवाय नगर परिषदा, पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायत निवडणुका होणार आहेत. सर्वच ठिकाणी भाजपसह महायुतीला विदर्भात आपले वर्चस्व प्रस्थापित करायचे आहे. त्याची सुरुवात जरी या मेळाव्याने झाली असली तरी गेल्या आठवड्यातच भंडारा जिल्हा मध्यवर्ती बँक आणि चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँक इथे भाजपने मित्रपक्षांना सोबत घेत आपली सत्ता प्रस्थापित करून आपले खाते उघडले आहेच.

# व्हिज्युअल डबिंगमध्ये एआयची चमक



ऑटोमेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ही आज सगळ्यात वेगाने वाढणारी क्षेत्रे बनत चालली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, बिग डेटा ॲनालिसिस, रोबोटिक्स या आणि यासारख्या घटकांमुळे संबंधित संगणकीय प्रणाली आणि यंत्रणा अधिकाधिक ऑटोनॉमस म्हणजे स्वतंत्रपणे निर्णय घेणाऱ्या आणि स्वयंभू बनत आहेत यात शंका नाही. इंडस्ट्री ४.०, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन, रोबोटिक्स आणि डेटा अनॅलिटीक्स हे उद्याच्या तंत्रजीवन पद्धतीचे अविभाज्य घटक असतील. व्यक्तिगत तर सोडाच; परंतु औद्योगिक, सामाजिक आणि सार्वजनिक पातळीवर संगणकाच्या या विविध अवतारांचे अत्यंत क्रांतिकारी आणि दूरगामी परिणाम होतील. अनेक पारंपरिक संकल्पना मोडीत निघून नव्या पद्धती चटकन रुळतील. आज संगणकीय सूक्ष्म तंत्राचा प्रवेश प्रत्येक पैलूमध्ये झालेला आढळेल, किंबहुना तो तसा असणे हेच आपण गृहीत धरू इतक्या सहज हा बदल होणार आहे. याला 'इंटेलिजंट कॉम्प्युटिंग' असे म्हटले जाते. या क्षेत्रातील सतत बदलणारे तंत्रज्ञान पाहून आपल्या जगण्याची कल्पनाच बदलते. बदलांचा हा वेग येत्या पाच-दहा वर्षांमध्ये अधिक वाढणार आहे. तो अधिक सर्वव्यापी होईलच, पण ज्या पैलूंमध्ये बदल दिसण्याची आपण कल्पनाही केली नव्हती अशा ठिकाणी तो आढळेल

आगीचा वापर किंवा चाकाच्या शोधापेक्षा कृत्रिम बुद्धिमत्ता हा एक महत्त्वाचा शोध टप्पा ठरू शकतो. हे जगात आतापर्यंतचे सर्वात वेगाने विकसित होणारे तंत्रज्ञान आहे. यामध्ये भाषा मॉडेल्स आणि सॉफ्टवेअर एजंट्सद्वारे अनेक व्हाईट-कॉलर नोकऱ्या पूर्णपणे संपवण्याची क्षमता आहे. तसेच बुद्धिमान ह्युमनॉइड रोबोट्सच्या वाढत्या पिढीद्वारे अनेक ब्ल्यू-कॉलर नोकऱ्याही संपू शकतात. हा असा पहिला शोध आहे, जो जवळजवळ प्रत्येक प्रकारे मानवापेक्षा श्रेष्ठ असण्याची धमकी देतो. कदाचित आपण विचार केला त्यापेक्षा लवकर. स्टिफन हॉकिंग्ज यांनी हा इशारा अनेक वर्षांपूर्वी दिला होता. आतापर्यंत शास्त्रीय आणि तांत्रिक बाबींमध्ये या तंत्राचा वापर झाला होता. मात्र कलाक्षेत्र यापासून दूर कसे राहील? चित्रपट एका भाषेत बनवला जातो. तो जगभरातील वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायचा असतो, तेव्हा डबिंगचा उपयोग केला जातो. यामुळे प्रेक्षकांना चित्रपट त्यांच्या स्वतःच्या भाषेत समजण्यास मदत होते आणि ते कथेला अधिक चांगल्या प्रकारे जोडले जातात. डबिंगमुळे चित्रपटाचा प्रेक्षकवर्ग अनेक पटींनी वाढतो. प्रेक्षकांना उपशीर्षके (सबटायटलस) वाचण्याऐवजी डब केलेला चित्रपट पाहणे अधिक सोयीचे आणि आरामदायक वाटते. विशेषतः, लहान मुले किंवा वाचायला त्रास होणाऱ्यांसाठी डबिंग अधिक उपयुक्त ठरते. एकाच चित्रपटाच्या आवृत्त्या वेगवेगळ्या भाषांमध्ये तयार केल्याने तो प्रादेशिक बाजारपेठेत यशस्वी होऊ शकतो. वेगवेगळ्या भाषांमध्ये चित्रपट पुन्हा शूट करण्यापेक्षा डबिंग करणे अधिक सोपे आणि कमी खचार्चे ठरते. यामुळे निर्मात्यांना कमी गुंतवणुकीत जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचता येते. आपण हे दाक्षिणात्य चित्रपटांबद्दल पाहिले आहे. आता अनेक चित्रपट एकाच दिवशी अनेक भाषेत प्रदर्शित केले जातात.

आज डबिंगमध्ये एआयचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे आणि या प्रक्रियेत अनेक महत्त्वपूर्ण बदल घडवत आहे. एआय-आधारित सॉफ्टवेअर मूळ संवादांचे जलद आणि अचूक भाषांतर करू शकते. एआय आता मानवासारखे नैसर्गिक आवाज तयार करू शकते. हे आवाज मूळ कलाकारांच्या आवाजाच्या टोन, लय आणि भावनांशी जुळवण्याचा प्रयत्न करतात. 'टेक्स्ट-टू-स्पीच' तंत्रज्ञानाचा वापर करून भाषांतरित मजकूर स्वयंचलितपणे आवाजात रूपांतरित केला जातो. एआय अल्गोरिदम व्हिडीओतील पात्रांच्या ओठांच्या हालचालींचे विश्लेषण करून तयार केलेला आवाज त्यांच्याशी जुळवण्याचा प्रयत्न करतात. एआय तंत्रज्ञान मूळ कलाकाराच्या आवाजाची नक्कल करू शकते. यामुळे डब केलेल्या संवादातही मूळ कलाकाराचाच आवाज असल्याचा अनुभव येतो. मूळ कलाकार डबिंगसाठी उपलब्ध नसतात किंवा त्यांचे निधन झालेले असते, अशा वेळी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरते. काही प्रगत प्रणाली, तर व्हिज्युअल माहितीचा वापर करून अधिक नैसर्गिक लिप-सिंक तयार करू शकतात. यामुळे डब केलेला भाग मूळ भागासारखाच दिसतो. इथे एक उदाहरण देता येते. 'वॉच द स्काय' हा स्वीडिश चित्रपट व्हिज्युअल डबिंग नावाच्या तंत्राचा वापर करून कलाकारांच्या ओठांच्या हालचालींमध्ये बदल करत असून एकही दृश्य पुन्हा शूट न करता आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांसाठी डब केलेल्या इंग्रजी संवादांनुसार मॅप करत आहे. लॉस एंजेलिस येथील 'फ्लॉलेस' ही चित्रपटनिमार्ती एआय फर्म आणि त्यांच्या ट्रूसिंक तंत्रज्ञानामुळे हे शक्य झाले आहे. ते अभिनेत्याच्या संपूर्ण कामगिरीचे विश्लेषण करते, त्यांच्या चेहऱ्याचे व्हॉल्यूमेट्रिक ३ प्रतिनिधित्व तयार करण्यासाठी डीप लर्निंगचा वापर करते आणि नंतर पोस्ट-प्रॉडक्शनमध्ये फुटेजमध्ये त्यांच्या तोंडाच्या हालचाली अनुकूल करते. डबिंगच्या क्षेत्रात एआय एक शक्तिशाली साधन म्हणून उदयाला आले आहे. यामुळे भाषांतर, आवाज संश्लेषण आणि लिप-सिंकसारख्या प्रक्रियांमध्ये सुधारणा झाली आहे. यामुळे चित्रपट निर्मात्यांना जागतिक स्तरावर मोठ्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचणे अधिक सोपे आणि प्रभावी झाले आहे. तथापि, भावनात्मक बारकावे आणि सांस्कृतिक संवेदनशीलता यांसारख्या काही क्षेत्रांमध्ये अजूनही मानवी हस्तक्षेपाची गरज भासते. त्यामुळे भविष्यात एआय आणि मानवी सहकायार्ने डबिंगची प्रक्रिया अधिक परिपूर्ण होईल यात शंका नाही. एआयमुळे व्हीएफएक्स आणि डबिंगमध्ये अनेक फायदे असले तरी काही आव्हानेदेखील आहेत. एआयमुळे काही कामे स्वयंचलित होत असल्याने कलाकारांच्या आणि डबिंग कलाकारांच्या नोकऱ्यांवर परिणाम होण्याची भीती आहे. तथापि, अनेक तज्ज्ञांचे मत आहे की एआय मानवी सर्जनशीलतेची जागा घेणार नाही, तर एक शक्तीशाली साधन म्हणून काम करेल. यामुळे कलाकार अधिक सर्जनशील कामांवर लक्ष केंद्रित करू शकतील. या पार्श्वभूमीवर डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर, सिंथेटिक आवाजांची संमती आणि सांस्कृतिक गैरसमज यासारख्या नैतिक मुद्द्यांचा विचार करणे महत्त्वाचे आहे. पूर्णपणे एआय-आधारित डबिंगमध्ये भाषिक आणि सांस्कृतिक बारकावे गमावले जाण्याची शक्यता असते. त्यामुळे या कामी मानवी देखरेख आवश्यक आहे. एकंदरीत, डबिंग उद्योगासाठी एआय गेम-चेंजर ठरले आहे. यामुळे निर्मिती प्रक्रिया अधिक कार्यक्षम, जलद आणि परवडणारी होत आहे. यामुळे मनोरंजन उद्योगात नवनवीन शक्यता निर्माण होत आहेत. भविष्यात, मानवी सर्जनशीलता आणि एआय तंत्रज्ञानाचे सहकार्य या क्षेत्रांना अधिक उंचीवर घेऊन जाईल. प्रेक्षकांना उपशीर्षके वाचण्याऐवजी डब केलेला चित्रपट पाहणे अधिक सोयीचे वाटते. लहान मुले किंवा नीट वाचू न शकणाऱ्यांसाठी डबिंग जास्त उपयुक्त ठरते. एकाच चित्रपटाच्या आवृत्त्या वेगवेगळ्या भाषांमध्ये तयार केल्याने तो प्रादेशिक बाजारपेठेत यशस्वी होऊ शकतो. वेगवेगळ्या भाषांमध्ये चित्रपट पुन्हा शूट करण्यापेक्षा डबिंग करणे अधिक सोपे आणि कमी खचार्चे ठरते. एआय तंत्रज्ञान या क्षेत्रात घडवत असलेल्या चमत्काराचा मागोवा.

# तांदूळ पीठ वापरा आणि त्वचा बनवा अधिक उजळ



**तां**दूळ पीठ आपण नेहमीच वेगवेगळ्या पदार्थांमध्ये वापरत असतो. पण तांदळाच्या पिठाचा उपयोग आपले सौंदर्य अधिक निखारण्यासाठी होतो हे तुम्हाला माहीत आहे का? तांदूळ पीठ पदार्थामध्ये चुरचुरीतपणा वाढवते. तर सौंदर्यात उजळपणा अधिक आणण्यासाठी मदत करते. तुम्हाला हे माहीत नसेल तर या लेखातून आम्ही तुम्हाला सौंदर्यासाठी तांदूळ पीठाचा कसा वापर करायचा आणि तांदूळ पिठाने तुमचे सौंदर्य कसे अधिक उजळेल याबद्दल सांगणार आहोत. खरे तर प्रत्येक घरामध्ये तांदूळ हा हमखास असतोच. याच तांदूळाच्या पिठापासून अनेक फेसपॅक बनवून आपण आपल्या सौंदर्यासाठी याचा वापर करू शकतो. या फेसपॅकमुळे हमखास तुमच्या रंगामध्ये उजळपणा येतो. तुम्हाला स्वतःला याचा वापर केल्यानंतर अनुभव येईल. सतत बाहेर असल्याने तुमची त्वचा टॅन होत असेल तर तुम्ही नक्कीच आम्ही दिलेले हे तांदळाचे फेसपॅक ट्राय करायला हवेत. जाणून घेऊया कसे तयार करायचे आणि कसे वापरायचे हे तांदळाच्या पिठाचे फेसपॅक -

### १. तांदूळ पीठ आणि गुलाबपाणी

एका भांड्यात २ टीस्पून तांदूळ पीठ घ्या आणि त्यामध्ये ४ चमचे गुलाबपाणी मिक्स करा. आता यामध्ये १ टीस्पून वितळवलेले तूप मिक्स करा. हे मिश्रण व्यवस्थित एकत्र करून घ्या. आता तयार झालेला हा फेसपॅक तुम्ही डाऊनस्ट्रोक करून तुमच्या चेहऱ्यावर नीट लावून घ्या. साधारण १५ मिनिट्स हा पॅक तसाच चेहऱ्यावर राहू द्या. नंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा. या फेसपॅकमुळे तुमच्या चेहऱ्यावर जर कोरडेपणा येत असल्याची तुम्हाला समस्या असेल तर ती निघून जाते आणि तुमच्या त्वचेवरील नैसर्गिक उजळपणा वाढण्यास मदत मिळते.



### २. टॉमेटो, दुधी आणि तांदूळ पीठ

एक टॉमेटो आणि दुधीची भाजी घ्या आणि दोन्ही मिक्सरमध्ये एकत्र करून त्याचा रस काढून घ्या. या रसामध्ये तुम्ही १ चमचा तांदूळ पीठ मिक्स करा. ही पेस्ट थोडी जाडसर बनवा. त्यानंतर चेहऱ्याला लावा आणि १५-२० मिनिट्स राहू द्या आणि मग चेहरा पाण्याने स्वच्छ करून घ्या. यामुळे तुमचा चेहरा अधिक उजळेल. चेहरा धुतल्यानंतर तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही तांदळाचे पाणी टोनर म्हणूनही वापरू शकता. यामुळेदेखील तुमचा चेहरा अधिक चमकदार होण्यास आणि उजळण्यास फायदा मिळू शकतो.


### 3. तांदूळ पीठ आणि बदाम तेल

तुमच्या चेहऱ्यावर काळे डाग आणि डार्क सर्कल्स वाढण्याची समस्या तुम्हाला सतावत असेल तर तुम्हाला हा फेसपॅक अगदी योग्य आहे. हा फेसपॅक तयार करण्यासाठी २ चमचे तांदूळ पिठामध्ये तुम्ही १ चमचा गुलाबपाणी मिक्स करा, त्यात १ चमचा बदाम तेल मिक्स करा. हे नीट मिक्स झाल्यावर चेहऱ्यावर लावा आणि साधारण अर्धा तास ठेवून धुवा. आठवड्यातून किमान तीन वेळा याचा वापर करा आणि नेहमी आपला चेहरा यामुळे ताजातवाना तुम्ही ठेऊ शकता. एका आठवड्यातच तुम्हाला याचा चांगला परिणाम दिसून येईल.

### ४. तांदूळ पीठ आणि चंदन पावडर

एका भांड्यात १ चमचा तांदूळ पीठ, १ चमचा चंदन पावडर आणि १ चमचा दही मिक्स करून घ्या. हे फेसपॅक चेहऱ्यावर लावा आणि साधारण पंधरा मिनिट्सने चेहरा धुवा. हा फेसपॅक तुमच्या चेहऱ्यावरील अशुद्धता दूर करतो आणि चेहऱ्यावर आलेल्या पिंपल्सची समस्यादेखील दूर करण्यसाठी फायदेशीर ठरतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे अतिशय नैसर्गिक असून यामध्ये कोणत्याही प्रकारचे केमिकल्स नसल्यामुळे चेहऱ्याला कोणत्याही प्रकारचा त्रास होत नाही. नैसर्गिक पद्धतीने चेहऱ्यावरील उजळपणा वाढण्यासाठी याची मदत मिळते.









### ५. बटाटा आणि तांदूळ पीठ

१ चमचा तांदळाच्या पिठामध्ये उकडून मॅश केलेला बटाटा मिक्स करा. त्यामध्ये आता १ चमचा मध आणि १ चमचा गुलाबपाणी मिक्स करा. हे मिश्रण नीट मिक्स करून चेहऱ्यावर वरून खाली अशा पद्धतीने लावा. त्यानंतर चेहऱ्यावर व्यवस्थित स्क्रब करा आणि साधारण १० मिनिट्सने तुम्ही चेहरा साफ करून घ्या. बटाटा हा नैसर्गिकरित्या ब्लीच म्हणून काम करतो तर त्यातील मध हे सेल्स रिपेअर करण्याचं काम करतात. तांदळामुळे चेहऱ्यावर अधिक उजळपणा येतो.



# आहारातून टाळा हृदयरोग

हृदयरोग आपल्यापासून दूर ठेवायचा असेल तर जीवनशैलीचा विचार करायला हवा. त्यामध्ये आहार हा महत्त्वाचा घटक आहे. योग्य आहारामुळे बरेच आजार आपल्यापासून दूर ठेवता येतात. हृदयरोगाचा धोका कमी करण्यासाठी पौष्टिक आहार हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. चांगली जीवनशैली व आहार उच्च रक्तदाब, रक्तातील कोलेस्ट्रॉल चे वाढते प्रमाण, लठ्ठपणा यांसारखे आजार टाळण्यास मदत करू शकतात. हे सर्व घटक हृदयरोग होण्यासाठी कारणीभूत ठरतात. जगभरात व आपल्या देशातही वाढते शहरीकरण, आर्थिक प्रगती, कामामुळे व फिरण्यासाठी वाढलेला प्रवास, बाहेरचे खाणे ही सर्व वाढत्या आजारांची कारणे आहेत. जेवणाची खालावलेली गुणवत्ता, पोषकतत्वे नसलेले साखर व मीठ जास्त असलेले पदार्थ नेहमी खाणे, मैदा व मैद्याच्या पदार्थांचा जास्त प्रमाणात आहारात समावेश, बाजारातील पॅकेटबंद खाण्याच्या पदार्थांचा रोज वापर इत्यादी गोष्टी आजकाल सगळ्यांच्या जीवनशैलीचा भाग बनले आहे. या सर्व सवयींचा परिणाम आरोग्यावर होतो. यामुळे सर्व आजारांना निमंत्रण मिळते व त्यात हृदयरोग, लठ्ठपणा व मधुमेह हे प्रामुख्याने लक्षणीय प्रमाणात वाढले आहे. आताच्या पिढीच्या पालकांमध्ये खाण्याच्या चुकीच्या सवयी व जीवनशैलीतील इतरही अयोग्य सवयींमुळे येतात. परिणामी आजारांचे प्रमाण खूप वाढले आहे. आपल्या व मुलांच्या चांगल्या आरोग्याची जबाबदारी आपलीच आहे हे विसरून चालणार नाही, तर हृदयरोग दूर ठेवण्यासाठी किंवा ज्यांना आधीच उच्च रक्तदाब किंवा कोलेस्ट्रॉल जास्त असेल त्यांनी काय काळजी घ्यावी हे बघुया.

**फळे व भाज्या** : फळे व भाज्या या अन्नगटातून आपल्याला भरपूर व्हिटामीन व मिनरल्स मिळतात. या अन्नगटाचा खूप मोठा फायदा म्हणजे यातून भरपूर तंतूमय पदार्थ शरीराला मिळतात. ही पोषकतत्त्वे हृदयरोगाचा धोका टाळण्यासाठी महत्त्वाची आहेत. बरेचदा पेशंटची माहिती घेताना लक्षात येते की, रोज फळे, कच्चे सलॅड खाल्ले जात नाही. काही विशेष कारण नसते किंवा या गोष्टींची आवड नाही असेही नसते. फक्त लक्षपूर्वक नियोजन केले जात नाही. जर सगळ्यांनी रोज एक-दोन फळे खाल्ली व कच्च्या भाज्यांचे एक वाटी सॅलड शिजवलेल्या व्यतिरिक्त खाल्ले तर खूप फायदा होईल.

**धान्ये** : वेगवेगळी सर्व प्रकारची धान्ये जी आपल्याकडे मिळतात त्या सर्वांचा आहारात समावेश असावा. धान्यांचे पीठ बनवताना जाडसर दळावे, मैद्यासारखे बारीक पीठ वापरू नये. जेवढा पीठात कोंडा असेल तेवढे चांगले. आजकालचे काही नवीन पदार्थ करताना ब्रेड वापरला जातो. तोदेखील गव्हाचा किंवा मल्टीग्रेन वापरावा. नेहमी पास्ता खाणाऱ्यांनी मैद्याचा पास्ता न खाता गव्हाचा पास्ता खावा. रोज भात खाणाऱ्यांनी हातसडीचा तांदूळ किंवा ब्राऊन राईस घेणे चांगले. हे थोडे बदल धान्याचे पदार्थ निवडताना केले तर आरोग्य चांगले राहायला मदत होईल.

**प्रोटीन** : आहारात प्रोटीनचा योग्य प्रमाणात समावेश करणेदेखील हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले आहे. डाळी, कडधान्ये, सुकामेवा, अंडी, मासे इत्यादी योग्य प्रमाणात घ्यावे. मटन किंवा मांसाहारी पदार्थातील लिवर किडनी असे भाग टाळवेत. आहारात सोयाबीनचाही उपयोग करता येईल. तसेच दूध व दुधाचे पदार्थ जसे दही किंवा पनीर तयार करताना साय काढून केल्यास उत्तम.

**तेल-तूप** : हृदयरोग म्हटल्यावर आपल्या सर्वांना माहिती आहे की, रक्तवाहिनीत चरबी साठून रक्त प्रवाहास अडथळा निर्माण झाल्यास हार्ट अटॅक येऊ शकतो. हा धोका टाळण्यासाठी योग्य प्रमाणातच आहारात तेल व तुपाचा समावेश करावा. प्रमाणाव्यतिरिक्त कुठले तेल वापरतो यानेदेखील फरक पडतो. आपल्या एकूण कॅलरीजच्या गरजेपैकी साधारणतः वीस टक्के स्निग्ध पदार्थातून म्हणजे तेल व तूपातून आल्या पाहिजेत. सामान्य तापमानात फ्रीजमध्ये न ठेवता जे तेल गोठते ते हृदयासाठी चांगले नाही जसे वनस्पती तूप किंवा बटर. वेगवेगळ्या तेलबियांमधील चांगले गुण आपल्याला मिळण्यासाठी वेगवेगळ्या तेलबियांचे तेल बदलून वापरले पाहिजे. जसे करडई, शेंगदाणा, सूर्यफुल, ऑलिव्ह या व्यतिरिक्त आहारात जवस, बदाम व अक्रोड घेतल्यास यातून मिळणारे तेल हृदयासाठी खूप फायदेशीर असते. ओमेगा - ३ फॅटी असिड असणारे हे तेल, आपल्या शरीरातले वाईट कोलेस्ट्रॉल कमी करून चांगले कोलेस्ट्रॉल वाढवते. मासे हे चांगल्या ओमेगा -३ तेलाचे उत्तम स्त्रोत आहे.

**या गोष्टी लक्षात ठेवा**

= बटरपेक्षा घरचे लोणी वापरा.

= बाजारातील पदार्थ घेताना त्याचे लेबल वाचा. जस त्यात ट्रान्स फॅट लिहिले असेल तर ते पदार्थ घेऊ नका.

= बेकरीचे पदार्थ जसे कुकीज, डोनटस्, खारी, बिस्किट इत्यादी टाळा.

= तळलेल्या पदार्थांपेक्षा उकडलेल्या, वाफवलेल्या किंवा भाजलेल्या पदार्थांना प्राधान्य द्या.

= रोज व्यायाम करा.

= ज्यांना हृदयरोग असेल त्यांनी डॉक्टर व आहारतज्ञांकडून वैयक्तिक मार्गदर्शन घेऊन त्याप्रमाणे आहार व जीवनशैलीत बदल करावे.

# असं डेकोरेट करा तुमचं बाल्कनी गार्डन



आपल्या प्रत्येकालाच बाल्कनीमध्ये सुंदर झाडं असावी किंवा छानसं गार्डन असावं, असं वाटतं. पण आपल्या धावपळीच्या आयुष्यात आणि मुंबईच्या जागेच्या प्रश्नात गार्डन असणं तर स्वप्नवत आहे. असो, प्रत्येकाच्या फ्लॅटला आजकाल फ्रेंच विंडोज किंवा बाल्कनीज असतातच. त्यामुळे आपण त्यालाच छोट्याश्या बाल्कनी गार्डनमध्ये बदलू शकतो. या सुंदर बाल्कनी गार्डनमध्ये तुम्ही पावसाळ्याच्या दिवसात बसून मस्तपैकी चहाचा आस्वाद घेऊ शकता तर थंडीच्या दिवसात उन्हाचा शेक घेऊ शकता. खासकरून पावसाळ्याचं पाणी हे रोपांसाठी जीवनदानाचं काम करतं. पावसाळ्यात त्यांची वाढ नैसर्गिकरित्या होते. इतर महिन्यांपेक्षा जुलै महिन्यात होणाऱ्या पावसाला रोपांचा जास्त प्रतिसाद असतो. त्यामुळे आपण या काळात तुमच्या बाल्कनी गार्डनला नवा लुक नक्कीच देऊ शकतो. हे पाहायलाही फ्रेश वाटेल आणि घरात सकारात्मक एनर्जीही येईल. फक्त यासाठी पाण्याचा निचरा होण्यासाठी ड्रेनेज सिस्टम आणि रोपांच्या रचनेमध्ये तुम्हाला थोडेफार बदल करावे लागतील. बाल्कनी गार्डनसाठी फॉलो करा या टीप्स -

**अशी करा झाडांची रचना आणि सजावट :** तुमच्या घरात जर एखादं जुन लाकडाचं टेबल असेल तर ते बाल्कनी किंवा टेरेसमध्ये शिफ्ट करा आणि त्यावर कुंड्या ठेवा. यामुळे तुम्हाला झाडांना व्यवस्थित पाणी देता येईल आणि गार्डनला एक वेगळा लुकही मिळेल. तुम्ही तुमच्या घरातील गार्डनला व्यवस्थित जागा दिल्यास त्यात तुम्ही पॉन्ड, वॉटर फॉल, बर्ड फिडर लावूनही डेकोरेट करू शकता. तसंच इतरही डेकोरेटीव्ह गोष्टींनी तुमची बाग सजवू शकता. जसं हँगिंग कुंड्या, रंगीबेरंगी पेबल्स, डिझाईनर स्टोन्स, कृत्रिम गवत किंवा अगदी घरातील जुन्या काचेच्या बाटल्यांचा किंवा तांब्याचं घंगाळ यांचाही वापर करू शकता. नेहमीच्या कुंड्यासोबतच बाजारात तुम्हाला बेडूक, कासव यांच्या आकारातील कुंड्याही आजकाल मिळतात. ज्या दिसायला नेहमीच्या कुंड्यापेक्षा छान असतात. यामध्ये रोपं लावून तुम्ही त्याच्या बाजून आर्टिफिशियल झऱ्याची रचना करू शकता.

**पावसाळयात घ्या रोपांची अशी काळजी :** पावसाळ्याच्या दिवसात जास्त वेगाने वाढणारी रोपं लावा. रोपांची लागवड करताना ती एका रांगेत लावता येतील ते पाहा. ज्यामुळे तुमच्या बाल्कनी गार्डनला छान लुक मिळेल. ज्या रोपांना प्रकाशाची गरज असते त्यांची जागा बदला. म्हणजे त्यांना ऊन आणि सावली दोन्ही चांगलं मिळेल. पाऊस पडताच किडे, गांडूळ आणि इतर पावसाळी किटक मातीतून बाहेर पडतात. जर तुम्ही बाल्कनीमध्ये रोपांची लागवड करत असाल तर या गोष्टींचीही काळजी तुम्हाला घ्यावी लागेल. त्यामुळे शक्यतो रोपं एकाच ठिकाणी ठेऊ नका. त्यांच्यामध्ये थोडं अंतर ठेवा, ज्यामुळे त्यांची स्वच्छताही तुम्हाला नीट करता येईल. तुम्ही तुमच्या जुन्या कुंड्यानाही रेनबो, छत्री, जंगल आणि फनी रेन सीन थीममध्येही कलर करू शकता. तसंच आजकाला कुंड्यांना लावण्यासाठी अनेक प्रकारचे कागदही मिळतात. ज्याने तुम्ही जुन्या कुंड्यांचा मेकओव्हर करू शकता. तुमच्या गॅलरीच्या कलरला मॅचिंग किंवा अपोझिट रंगसंगती तुम्ही कुड्यांसाठी वापरू शकता. तसंच पावसाळ्याच्या दिवसात कुंड्यामध्ये किंवा बाल्कनीत पाणी साचून राहणार नाही, याचीही खास काळ्जी घ्या. नाहीतर त्यामुळे आजारांना आमंत्रण मिळू शकतं.

# प्रमाणातील आहार शरीरासाठी पोषक



**मा**णसाच्या शरीरात खास करून रक्तवाहिन्यांच्या भिंती आणि मेंदूमध्ये असंपृक्त (अनसॅच्युरेटेड) फॅट्स योग्य प्रमाणात असतील तर आरोग्य चांगले रहाते. तुपाबद्दलही थोडे जाणून घ्यायला हवे. कोणता पदार्थ किती खावा, तो आपल्या प्रकृतीला मानवतो की नाही, हे ठरण्याचे कोणतेही ठोकताळे नाहीत.

त्यामुळे शरीराची गरज लक्षात घेऊन स्वनियंत्रण ठेवून योग्य प्रमाणात पदार्थांचे सेवन करायला हवे. तूप हा प्रकार खास भारतीय आहे. जगात इतरत्र कुठेही तूप केले जात नाही. परदेशात क्लॅरिफाइड बटर नावाचा प्रकार असतो. जगभरात दुधातील स्निग्धांश वेगळा काढतात, तो दूध ढवळून. आपण ज्याला लोणी म्हणतो ते आणि बटर हेच मुळात वेगळे प्रकार आहेत.

आपल्याकडे दुधाला विरजण लावतात, त्याचे दही बनते. त्या दह्याचे ताक केले जाते. ताकातून लोणी वेगळे काढून त्या लोण्यापासून तूप तयार होते. तूप थंड होताना कणीदार आणि घट्ट होते. परदेशांत दुधातून साय (क्रीम) वेगळी काढतात व त्याचे बटर केले जाते. यात पाणी आणि स्निग्ध पदार्थ एकमेकांत मिसळून राहतात ते दुधातील प्रथिनांमुळे. ते तापवून त्यातील स्निग्धांश वेगळा काढतात ते क्लॅरिफाइड बटर. यात मुख्यतः दही होण्याची पायरी गाळलेली असते.

या क्लॅरिफाइड बटरमधे संपृक्त (सॅच्युरेटेड) फॅट्स असतात. त्यामुळे हृदयविकाराचा झटका येतो असे बऱ्याच चाचण्यांत दिसून आले आहे. इथे एक नमूद करायला हवे की या चाचण्या तुपावर केलेल्या नाहीत. तूप आणि क्लॅरिफाइड बटर यांची केवळ रासायनिक परीक्षा करून उपयोग नाही, तर त्यांची रुग्णांवर चाचणी व्हायला हवी. अशा चाचणीसाठी खरेतर तूप विकणाऱ्या कंपन्यांनी पुढाकार घ्यायला हवा.

किंवा अनेक आयुर्वेदिक औषधे जी तुपातून घ्यायला सांगतात अशा औषध कंपन्यांनी तरी या चाचण्या करायला हव्यात. तुपाचे अनेक फायदे आहेत परंतु ते विस्तृत चाचण्यांतून सिद्ध व्हायला हवेत.

हे सगळं वाचताना तुम्हाला वाटत असेल की, अगदी सुरुवातीस; खाण्यातील स्निग्ध पदार्थ किंवा कोलेस्टेरॉल आणि हृदयविकाराचा संबंध नाही अशा पोस्ट सोशल मीडियामध्ये वाचण्यास मिळतात त्यात कितपत तथ्य आहे या बद्दल काहीच माहिति दिलेली नाही. खाण्याचा आणि रक्तातील चरबीचा घनिष्ठ संबंध नाही हे सिद्ध झाले आहे. परंतु लक्षपूर्वक वाचा... मोठ्या प्रमाणावर चरबी निर्माण होणे शरीरासाठी अपायकारकच आहे. खाण्यातील स्निग्ध पदार्थ बाद केले तरी कोलेस्टेरॉल निर्माण होणे थांबत नाही. (कार्ब्जपासूनही शरीर कोलेस्टेरॉल तयार करू शकते). म्हणूनच 'ऑइल फ्री' खाऊनही काही फायदा नाही. 'ऑइल फ्री' फास्ट फूड खात राहिले तरी चरबी खूप वाढू शकते. आता सर्वात महत्त्वाचे... रक्तातील कोलेस्टेरॉल खूप वाढले तर हृदयविकाराचा झटका येतोच. त्याचा आणि कमी तेल सेवन करण्याचा संबंध नाही. तात्पर्य, कोणताही पदार्थ अतिप्रमाणात खाऊ नये. तसेच, सतत अमूक पदार्थ खाल्ल्याने वजन वाढेल ही भावना मनात ठेवू नये. प्रमाणात खाल्लेले पदार्थ शरीरासाठी पोषकच ठरतात.

# वाईनबाबतच्या या गोष्टी तुम्हाला माहीत आहेत का



**अ**गदी हार्ड नाही पण आरोग्यदायी आणि हमखास घेतले जाणारे ड्रींक म्हणजे वाईन किंवा एखाद्या घरी जाताना तुम्हाला गिफ्ट म्हणून वाईन न्यायची असल्यासही काही बेसिक गोष्टी माहीत हव्यातच. त्यामुळे वाईन घेताना त्याबाबतच्या पुढील गोष्टीही तुम्हाला माहीत असल्यास तुम्ही नवशिक्या वाटणार नाही. जसे स्वीट वाईन, क्रॉक्र्ड, बुके किंवा फिनिश या वाईनबाबतच्या काही खास टर्म्स आहेत. ज्यामुळे तुम्हाला वाईन निवडणे आणि घेणे दोन्हीही सोपे जाईल.

**ड्राय वाईन :** ही एक प्रकारे नैसर्गिक रूपातील वाईन असते. जी चवीला गोड असते, असे म्हटले जाते. अगदीच गोड नाही पण गोडसर असते. ज्यामुळे या वाईनला ड्राय वाईन असे म्हणतात.

**स्वीट वाईन :** या वाईनमध्ये जास्त प्रमाणात साखर असते. साधारणतः या वाईनला डेझर्ट वाईन किंवा पुडींग वाईन असे म्हटले जाते.


**एसिडिक वाईन :** ज्या घटकांनी ही वाईन तयार केली जाते, त्यामध्ये नैसर्गिकरित्या एसिड असते. तर काहीवेळा एसिड फर्मेंटेशन प्रक्रियेदरम्यान निर्माण होऊन वाईनमध्ये मिक्स होते. या वाईन्सची चव लिंबू किंवा व्हिनीगरसारखी असते.

**टॅनिन्स :** फिनॉलिक नावाच्या घटकामुळे वाईनला एक कटवट चव येते. तर दुसरीकडे टॅनिन, वाईनच्या कडवट चवीला कायम ठेवते. ही तीच चव आहे जी तुम्हाला चहामध्ये मिळते. टॅनिन हे एक नैसर्गिक प्रिजर्वेटिव्ह आहे. जे वाईनला बऱ्याच काळापर्यंत प्रिर्जव्ह ठेवण्याच्या प्रक्रियेत वापरले जाते.

**बुके :** बुके म्हणजे जुन्या वाईनचा वास होय. आपल्याला बरेचदा पाहायला मिळते की, लोके जुन्या आणि वर्षानुवर्ष साठवलेल्या वाईनना जास्त पसंती देतात. तर अशाप्रकारच्या वाईनची क्वालिटी चेक करताना प्रमाण ठरते ते म्हणजे बुके. वाईनमध्ये फळ, मसाले आणि अनेक प्रकारचे सुंगध असू शकतात. खरंतर द्राक्षांच्या व्हरायटीपासून ते त्याच्या स्थितीनुसार आणि ठिकाणानुसार यावरील गोष्टी ठरत असतात.

**क्रॉक्र्ड :** जी वाईन खराब होते तिला क्रॉक्र्ड वाईन असे म्हटले जाते.

**फिनिश :** फिनिश हा एक प्रकारचा फ्लेव्हर आहे, जो वाईन प्यायल्यानंतर तुमच्या तोंडात घोळत असतो. साधारणतः याला वाईन प्यायल्यावरची आफ्टर टेस्ट असे म्हटले जाते.



## शांत झोपेसाठी घरगुती उपाय

निरोगी स्वास्थ्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम आवश्यक आहे. पण त्याचबरोबर पुरेशी झोप घेणे देखील गरजेचे आहे. आजकाल शांत झोप मिळणे दुर्मिळ झाले आहे. लांबलेल्या कामाच्या वेळा, ताण, तणाव यामुळे नीट झोप लागत नाही. आपल्यापैकी अनेकांनी याचा अनुभव घेतला असेल. झोप न लागण्याची अनेक कारणे असतील पण त्यामुळे आरोग्यावर परिणाम होवून त्याचा समस्या उद्भवू लागतात. अपुऱ्या झोपेमुळे कामावर देखील परिणाम होतो. अधिक चांगले काम करण्यासाठी शांत झोपेची गरज असते. कारण त्यामुळेच मन शांत, प्रसन्न राहतं व शरीराला ऊर्जा प्राप्त होते. म्हणून शांत झोप येण्यासाठी हा घरगुती उपाय खूपच फायदेशीर ठरतो. हा उपाय अतिशय सोपा आहे. खसखस गोल्डन ब्राऊन होईपर्यंत तव्यावर थोडी भाजून घ्या. त्यानंतर खसखस ग्राईंड करून घ्या. मग कोमट दुधात जायफळ आणि खसखस पावडर घाला. नीट मिक्स करून दूध प्या. त्यामुळे तुम्हाला नक्कीच शांत झोप लागण्यास मदत होईल.

# मिठीचा गाळ, गोतास काळ; ७,००० पानांचे आरोपपत्र, मोठे मासे सापडणार!

## मुंबई पोलिसांकडून मिठी नदी गाळ काढणी घोटाळा उघड

## ६५.५४ कोटींचा धक्कादायक प्रकार!

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

६५.५४ कोटींच्या मिठी नदीतील गाळ काढणी घोटाळ्यासंबंधी एका महत्त्वाच्या घडामोडीत, मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने अटक केलेल्या मध्यस्थ केतन कदम आणि जय जोशी यांच्याविरुद्ध न्यायालयात ७,००० पानांचे सर्वसमावेशक आरोपपत्र सादर केले आहे. पोलीस सूत्रांनी याची पुष्टी केली की, सोमवारपर्यंत न्यायालय या आरोपपत्राची अधिकृत दखल घेईल.



आरोपपत्रात भारतीय न्याय संहिता कलम ४७४ अंतर्गत बनावट कागदपत्रे बाळगल्याबद्दलचा समावेश आहे. अधिकाऱ्यांनी अहवाल दिला आहे की, आर्थिक गुन्हे शाखेने १५-१६ साक्षीदारांचे जबाब नोंदवले आहेत आणि आरोप केला आहे की, कदम आणि जोशी यांनी निविदा फेरफारातून एकूण ९ कोटी रुपयांपैकी ४.५ कोटी रुपये बेकायदेशीरपणे गोळा केले. भारतीय न्याय संहिता कलम १९३(९) अंतर्गत पुढील तपास आणि पूरक आरोप सुरू राहतील.

आरोपपत्रानुसार, कदम आणि जोशी यांनी मध्यस्थ म्हणून काम केले, ज्यांनी गाळ काढणीचे कंत्राट पूर्व निवडलेल्या कंपन्यांना मिळवून दिले. या घोटाळ्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेचे उच्चपदस्थ अधिकारी आणि अनेक खाजगी कंत्राटदार कंपन्यांचे संचालक सामील आहेत.

६ मे रोजी आझाद मैदान पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या 'फर्स्ट इन्फॉर्मेशन रिपोर्ट' मध्ये १३ व्यक्तींना आरोपी म्हणून नाव दिले आहे. यात सरकारी अधिकाऱ्यांमध्ये मुख्य आरोपी म्हणून ओळखले गेलेले सहाय्यक अभियंता प्रशांत रामुगडे, निवृत्त मुख्य अभियंता गणेश बेंद्रे आणि उपमुख्य अभियंता (पूर्व उपनगर) तायशेट्टी यांचा समावेश आहे. प्रमुख खाजगी क्षेत्रातील आरोपींमध्ये दीपक मोहन आणि किशोर मेनन (मॅटप्रॉप टेक्निकल सर्व्हिसेस प्रा. लि. चे संचालक), भूपेंद्र पुरोहित (त्रिवेदी कंत्राटदारांचे मालक) आणि अक्युट कन्स्ट्रक्शन, कैलास कन्स्ट्रक्शन, एन.ए. कन्स्ट्रक्शन आणि जेआरएस इन्फ्रास्ट्रक्चरचे संचालक यांचा समावेश आहे, ज्यांना आरोपपत्रात पाहिजे असलेले आरोपी म्हणून सूचीबद्ध केले आहे.

आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासात पक्षपातीपणा आणि निविदा फेरफाराचा एक सातत्यपूर्ण नमुना उघड झाला आहे. २०२३-२४ मध्ये, भूपेंद्र पुरोहित यांच्या मालकीच्या त्रिवेदी एंटरप्रायझेसने गाळ काढणीचे कंत्राट मिळवले. मागील वर्षांमध्ये, पुरोहित यांच्याशी जोडलेल्या कंपन्या, ज्यात एम.बी. ब्रदर्स आणि तनिषा एंटरप्रायझेस, ज्या त्यांच्या भावाशी आणि मेहुण्याशी संबंधित असल्याचा आरोप आहे, त्यांना रामुगडे आणि कदम यांच्या कथित प्रभावाखाली बीएमसीच्या निविदांमध्ये सातत्याने प्राधान्य दिले गेले.

निविदेच्या अटी कथितरित्या प्रतिस्पर्धकांना वगळण्यासाठी सानुकूलित केल्या जात होत्या, हे सुनिश्चित करण्यासाठी की केवळ पुरोहितच्या कंपन्याच पात्र ठरतील. २०२१ पर्यंत प्रत्यक्ष यंत्रसामग्री तैनात नसतानाही, देयके दिली गेली. विशेषतः, २०२१ मध्ये, निविदांमध्ये गाळ काढणीसाठी आठ मशीनची आवश्यकता होती, तरीही जूनपर्यंत एकही मशीन तैनात नव्हते. २०२२ आणि २०२३ मध्येही हाच नमुना दिसून आला, जिथे कोणतीही मशीन वापरली गेली नाही, परंतु भरीव देयके दिली जात राहिली.

# टेस्ला मुंबईत पहिले चार्जिंग स्टेशन सुरू करणार!

■ **मुंबई । प्रतिनिधी,**

अमेरिकन इलेक्ट्रिक वाहन उत्पादक टेस्लाने घोषणा केली आहे की, त्यांचे भारतातील पहिले चार्जिंग स्टेशन पुढील आठवड्यात मुंबईत सुरू होईल. या नवीन सुविधेत डीसी चार्जिंगसाठी चार श्4 सुपरचार्जिंग स्टॉल आणि एसी चार्जिंगसाठी चार डेस्टिनेशन चार्जिंग स्टॉल असतील. सुपरचार्जर २५० किलोवॅट प्रति तास इतक्या वेगाने चार्जिंग सुविधा देतील, ज्याचा दर प्रति 'हँ २४ रुपये असेल, तर डेस्टिनेशन चार्जर ११ 'ह वेगाने चार्जिंग देतील, ज्याचा दर प्रति 'हँ १४ रुपये असेल. टेस्लाने सांगितले की, हे गेल्या महिन्यात मुंबईत लॉन्च झालेल्या आठ सुपरचार्जिंग स्थळांपैकी पहिले आहे. टेस्ला मालकांना सोयीस्कर क्रॉस-कंट्री प्रवासाची सुविधा देण्यासाठी देशभरात पुढील विस्तार करण्याची योजना आहे. टेस्लाने जुलैमध्ये ५९.८९ लाख रुपयांपासून सुरू होणाऱ्या 'मॉडल ' सह भारतीय बाजारात अधिकृतपणे प्रवेश केला. कंपनीने मुंबईतील बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्समधील मेकर मॅक्सिटी कमर्शियल कॉम्प्लेक्समध्ये आपले पहिले अनुभव केंद्रही उघडले आहे. बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स सुविधा इव्ही वापरकर्त्यांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी फास्ट-चार्जिंग आणि स्टँडर्ड चार्जिंग दोन्ही पर्याय प्रदान करते. टेस्लाच्या मते, त्याचे सुपरचार्जर 'मॉडल ' ला केवळ १५ मिनिटांत २६७ किलोमीटरपर्यंतची रेंज देतात, जे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया दरम्यान पाच राऊंड ट्रिपसाठी पुरेसे आहे. आपल्या ग्राहक ऑफरचा एक भाग म्हणून, टेस्ला प्रत्येक नवीन कार खरेदीसोबत एक मोफत वॉल कनेक्टर देखील प्रदान करेल, जो खरेदीदाराच्या निवासस्थानी स्थापित केला जाईल.

# साप चावल्याने ६ वर्षांच्या मुलाचा मृत्यू

■ **विरार। प्रतिनिधी,**

नालासोपारा येथे साप चावल्याने ६ वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला आहे. नालासोपारा पूर्वेच्या मोरेगाव परिसरात ही घटना घडली आहे. नमन यादव असे या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या मुलाचे नाव आहे. नालासोपारा पूर्वेच्या मोरेगाव येथील अशोक पाटील चाळीत उमेश यादव हे पत्नी आणि मुलासह रहात होते. गुरूवारी साकळी ८ वाजता मुलगा नमन (६) घराबाहेर खेळत असताना त्याला विषारी सापाने दंश केला. त्याचा उपचारासाठी पालिकेच्या तुळींज रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी तुळींज पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली आहे. वसईझ्रविरार शहरात मागील काही दिवसांपासून मुसळधार सुरू असून विविध ठिकाणच्या भागात पाणी साचल्याने साप निघण्याचे प्रकार वाढले आहेत. आधीच करोनाचे संकटामुळे नागरिक चिंतेत आहेत. त्यात आता साप निघण्याच्या प्रकारातही वाढ झाल्याने भीतीचे वातावरण आहे. वसई शहरातील बहुतेक परिसराला लागूनच नाले व जंगल परिसर गेल्याने हे साप थेट नागरी वस्तीत शिरकाव करू लागले आहेत. दाटीवाटीच्या एखाद्या ठिकाणी साप गेल्यास त्यावर लक्ष ठेवणेसुद्धा कठीण जाऊ लागले आहे. तसेच जंगल पट्ट्यात अतिक्रमण करून अनेका विकासकांनी बेकायदा बांधकामे केली आहेत. त्यामुळे साप हे थेट नागरी वस्तीत शिरकाव करू लागले आहेत.

# मूर्तिकारांना 11 हजार लीटर नैसर्गिक रंग वाटप, जलप्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेचा उपक्रम



■ **मुंबई । प्रतिनिधी,**

गणेशोत्सव साजरा करताना पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी मुंबई महापालिकेने पर्यावरणपूरक गणेशोत्सव उपक्रम अधिक बळकट करण्याचा प्रयत्न केला आहे. मूर्तिकारांना मोफत शाडू माती देण्याचा उपक्रम राबवल्यानंतर आणि प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर मूर्तिकारांना मंडपाकरीता जागा देत अधिकाधिक सुविधा मुंबई महापालिकेने उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यानंतर आता मूर्तिकारांना प्रायोगिक तत्त्वावर पर्यावरणपूरक नैसर्गिक रंगांचा पुरवठा करण्यात येणार आहे.मुंबईतील हॉटेल्स यंदा प्रथमच मुंबई महापालिकेकडून गणेश मूर्तिकारांना नैसर्गिक रंगांचा पुरवठा प्रायोगिक तत्वावर केला जाणार आहे. जलप्रदूषणाला रोखण्यासाठी महापालिकेने हा उपक्रम राबवण्याचे ठरवले आहे. यात सहा पर्यावरणपूरक रंगांचा समावेश केला आहे. 7 हजार 800 लीटर रंग आणि 3 हजार लीटर इको प्रायमर पुरवण्यात येणार आहे. जलप्रदूषण रोखण्यासाठी मूर्तिकारांनी या नैसर्गिक रंगांचा वापर करावा, असे आवाहन मुंबई महापालिकेने केले आहे. मुंबईत शाडू मातीच्या मूर्ती घडवण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, जास्तीत जास्त पर्यावरणपूरक मूर्तींची प्रतिष्ठापणा व्हावी यासाठी महापालिकेकडून मूर्तिकारांना गतवर्षीप्रमाणे यंदाही मोफत शाडू माती पुरवण्यात आली आहे. आतापर्यंत 952 टन माती पुरवण्यात आली आहे. यासोबतच 997 मूर्तिकारांना मूर्ती घडवण्यासाठी मंडपासाठी जागाही देण्यात आली. गणेशोत्सवात मूर्ती रंगवण्यासाठी वापरले जाणारे रासायनिक रंग हे पर्यावरणासाठी घातक ठरू शकतात. त्यामुळे विसर्जनाच्या वेळी जलस्त्रोतांचे प्रदूषण होऊन सार्वजनिक आरोग्यावर घातक परिणाम होऊ शकतात. या पार्श्वभूमिवर महापालिकेने मूर्तिकारांना शक्य तितक्या पर्यावरणपूरक रंगांचाच वापर करण्याचे आवाहन केले आहे. मुंबई महापालिका प्रशासन आता मूर्तिकारांना मूर्ती रंगवण्यासाठी पांढरा, नारंगी, पिवळा, हिरवा, निळा आणि लाल असे सहा पर्यावरणपूरक रंग पुरवणार आहे. यामध्ये इतर रंगांच्या तुलनेत पांढरा रंगाचा पुरवठा जास्त असेल. मूर्तिकारांनी त्यांच्या परिसरातील प्रशासकीय विभाग कार्यालयात (वॉर्ड ऑफिस) संपर्क साधावा, असे आवाहन उपायुक्त (परिमंडळ 2) तथा श्रीगणेशोत्सवाचे समन्वयक प्रशांत सपकाळे यांनी केले आहे. मूर्तिकारांनी या पर्यावरणपूरक रंगांचा वापर करून पर्यावरणपूरक उत्सवासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# सांगा चूक कोणाची? लपवाछपवी कोणासाठी? बीएमसी आणि म्हाडामध्ये घमासान!

■ **मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांच्यात चांदिवलीतील सार्वजनिक वापरासाठी असलेल्या भूखंडावर कथितरित्या अनधिकृतपणे बांधलेल्या ग्रंथालयावरून वाद सुरू झाला आहे. ही इमारत म्हाडाच्या झोपडपट्टी सुधार मंडळाने बांधली आहे.





बीएमसीचा दावा आहे की, त्यांनी या इमारतीला अवैध ठरवून नोटीस जारी केली होती, तर म्हाडाने अशी कोणतीही नोटीस मिळाल्याचे नाकारले आहे. २३ जुलै रोजी बीएमसीने एका रहिवाशांच्या तक्रारीवरून चांदिवली फार्म रोडवरील म्हाडाच्या झोपडपट्टी सुधार मंडळाने बांधलेल्या या ग्रंथालयाबाबत नोटीस जारी केली होती. सार्वजनिक वापरासाठी असलेल्या जमिनीवर ही वादग्रस्त इमारत अग्निशमन दलाच्या आवश्यक 'ना-हरकत प्रमाणपत्रा'शिवाय बांधली गेली होती, जे बीएमसीच्या अखत्यारीत येते.

बीएमसीच्या 'ऑटोडीसीआर' वेबसाइटवर उपलब्ध कागदपत्रे दर्शवतात की, ग्रंथालयाच्या लेआउट योजनेला मंजुरी मिळालेली नाही आणि त्यात 'आयओडी' (इंटिमेशन ऑफ डिसअप्रूव्हल) आणि 'सीसी' (कमेंसमेंट सर्टिफिकेट) या दोन्हीची कमतरता आहे. बीएमसीने रहिवाशांची तक्रार बंद केली असली तरी, 'महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन' कायद्यांतर्गत नोटीस जारी केली असल्याचे सांगून, म्हाडाने मात्र महापालिकेकडून कोणतेही पत्रव्यवहार मिळाले नसल्याचे म्हटले आहे.

माध्यमातील वृत्तानंतर म्हाडाने दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, हा प्रकल्प 'आमदार स्थानिक विकास कार्यक्रम'चा भाग होता आणि त्याला १३ सप्टेंबर २०२४ रोजी उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयातून प्रशासकीय मंजुरी मिळाली होती. म्हाडाने दावा केला की, बीएमसीकडून २६ फेब्रुवारी २०२५ रोजी 'ना-हरकत प्रमाणपत्र' मिळाल्यानंतरच जागेवरील काम सुरू झाले. मात्र, १२ ऑगस्ट रोजी छायाचित्रात्मक पुराव्यांसह असे समोर आले की, स्थानिक रहिवाशांनी या बांधकामाला विरोध केला होता, त्यांचे म्हणणे होते की, हे काम सार्वजनिक वापरासाठी असलेल्या जमिनीवर समाजाला विश्वासात न घेता केले गेले. म्हाडाने, याउलट, पुन्हा एकदा सांगितले की, त्यांच्याकडे महापालिकेकडून 'एनओसी' असल्याने ही इमारत बेकायदेशीर नाही.

'आयओडी', 'सीसी' आणि 'फायर एनओसी' च्या अनुपस्थितीबद्दल म्हाडाच्या स्पष्टीकरणात मौन साधण्यात आले, जे कोणत्याही बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी अनिवार्य आहेत. विशेषतः, म्हाडाने अग्निशमन दलाच्या 'एनओसी'साठी दोनदा अर्ज केला होता, परंतु बांधकाम पूर्ण झाल्यानंतर अर्ज सादर केल्यामुळे अग्निशमन दलाने दोन्ही विनंत्या नाकारल्या.


आम्हाला बीएमसीकडून कोणतीही नोटीस मिळालेली नाही. बीएमसीच्या जमिनीवर काम बीएमसीकडून 'एनओसी' मिळाल्यानंतरच सुरू झाल्यामुळे, प्रकल्प बेकायदेशीर असण्याची शक्यता नाही, असे म्हाडाच्या मुख्य जनसंपर्क अधिकाऱ्यांनी सांगितले. यापूर्वी जूनमध्ये, एल-वॉर्डचे सहायक महानगरपालिका आयुक्त धनाजी हरळेकर यांनी 'एफपीजे'ला सांगितले होते, बांधकाम म्हाडाने केले आहे आणि त्यांना सर्व आवश्यक परवानग्यांची काळजी घ्यावी लागेल. आम्ही आमच्या बाजूने आवश्यक परवानग्या दिल्या आहेत.

दोन्ही सार्वजनिक प्राधिकरणे परस्परविरोधी दावे करत असल्याने, जबाबदारीचा प्रश्न कायम आहे. चांदिवलीच्या रहिवाशांनी आपली नाराजी व्यक्त केली आहे, त्यांचे म्हणणे आहे की, परस्परविरोधी विधाने संशय निर्माण करतात आणि अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे करतात. चांदिवली सिटीझन्स वेल्फेअर असोसिएशन चे संस्थापक मनदीप सिंग मक्कर म्हणाले, म्हाडा स्पष्टपणे चुकीची माहिती देत आहे आणि आता ते पकडले गेल्यावर क्षुल्लक सबबी देत आहेत. त्यांनी बांधकाम सुरू करण्यापूर्वी 'डीसीपीआर २०२४' नुसार वैधानिक आणि अनिवार्य आवश्यकता पूर्ण केल्या नाहीत. नागरिकांना प्रशासकीय प्रोटोकॉलची माहिती असेल आणि ते त्यांच्या कामाची योग्य ती तपासणी करतील अशी त्यांना अपेक्षा नव्हती. जर ते त्यांच्या संरचनेला कायदेशीर असल्याचे सांगत असतील, तर आम्ही त्यांना आम्हाला चुकीचे सिद्ध करण्याचे खुले आव्हान देतो.

# हल्लेखोराला पकडण्यासाठी पोलिसांनी बनवले फेक इन्स्टाग्राम अकाउंट

■ **मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबईतील धारावी परिसरात एप्रिल महिन्यात एका वीस वर्षीय तरुणाने एका व्यक्तीला धारदार हत्याराने वार करत जखमी केल्याची घटना समोर आली होती. या घटनेनंतर दुसऱ्याच दिवशी धारावी पोलीस ठाण्यामध्ये जखमी झालेल्या व्यक्तीच्या फियार्दीनुसार तक्रार करण्यात आली होती. पोलिसांनी या संदर्भात गुन्हा दाखल करत चौकशी करायला सुरुवात केली होती. मात्र या प्रकरणामधील आरोपी पसार झाला होता. हल्लेखोराला पकडण्यासाठी पोलिसांनी अनोखी शक्कल लढवली. ओळख लपवून सतत पोलिसांना गुंगारा देत असल्याने आरोपी पर्यंत पोहोचण्याचे आव्हान पोलिसांसमोर होते. आरोपी इंस्टाग्रामवर एक्टिव्ह असल्याचे दिसताच पोलिसांनी मुलीच्या नावाने अकाउंट बनवून त्याला रिक्वेस्ट पाठवली. सुंदर मुलीचा फोटो बघून त्याने रिक्वेस्ट स्वीकारली. तिच्याशी काही दिवस चॅटिंग सुरू केले . तोपर्यंत पोलिसांनी माग काढत त्याच्या मुसक्या आवळल्या. मुंबई पोलिसांच्या सूचनेनुसार तेथील अंबड पोलिसांनी सिडको कॉलनीतून त्याच्या मुसक्या आवळल्या. पोलिसांनीच इन्स्टाग्रामवरून रचलेल्या हनीट्रॅपमध्ये अडकल्याचे लक्षात येताच डोक्यावर हात मारण्याची वेळ आरोपीवर आली.





शुभम कोरी १९ असे आरोपीचे नाव असून, त्याच्याविरोधात हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल आहे. धारावीत राहणाऱ्या शुभमचा एका तरुणाशी वाद झाला होता. तरुणाच्या गळ्यावर चाकूने वार करून शुभम पसार झाला. गुन्हा दाखल झाल्यानंतर वरिष्ठ निरीक्षक राजा बिडकर, पोलिस निरीक्षक अशोक उगले यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विकास शेलार व त्यांच्या पथकाने आरोपीचा शोध सुरू केला. अटकेपासून वाचण्यासाठी शुभम मोबाइल वापरत नव्हता. सतत वेगवेगळ्या ठिकाणी फिरत होता. त्याने नातेवाईक, कुटुंबीयांसोबतचाही संपर्क तोडला होता.

पोलिसांनी त्याचा सोशल मीडियावरून पाठलाग सुरू केला. तो इन्स्टाग्रामवर सक्रिय असल्याचे समजताच पोलिसांनी तोच धागा पकडून तपासाला सुरुवात केली. सुंदर तरुणीच्या नावाने पोलिसांनी इन्स्टाग्राम खाते बनवून शुभमला रिक्वेस्ट पाठवली. त्याने मुलीची रिक्वेस्ट तत्काळ स्वीकारली. तिच्याशी चॅटिंग सुरू केले. तरुणीच्या मधाळ संवादात हरवून पोलिसांनी त्याचे नाशिकमधील लोकेशन शोधले. तेथील अंबड पोलिसांनी सिडको कॉलनीतून त्याच्या मुसक्या आवळल्या.

अचानक पोलिस धडकल्याने शुभम चक्कर येऊन कोसळला. त्याला लहानपणापासून फिट्स (मिरगी) येतात. पोलिसांनी त त्याला नाशिकच्या रुग्णालयात दाखल केले. मुंबईत घेऊन येत असताना त्याला पुन्हा चक्कर आली. पोलिसांनी त्याच्या कुटुंबीयांना याबाबत सांगून त्याला सायन रुग्णालयात दाखल केले असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. सदर आरोपीला लहानपणापासून फिट येण्याचा त्रास असल्याने अंबड पोलीस ठाणे, नाशिक येथे तशी नोंद घेण्यात आली. तसेच त्यावेळी त्याचा मोठा भाऊ अभिषेक मनोज कोरी, वय २४ वर्षे हा सोबत होता.

# जुहू बीचवर २० वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू, थरकाप उडवणारे १४ तास!

■ **मुंबई । प्रतिनिधी,**

जुहूच्या सिल्वर बीचवर गोदरेज गेटजवळ समुद्रात वाहून गेलेल्या दोन तरुणांपैकी, विघ्नेश मुर्गेश देवेंद्रम (२०) या बेपत्ता तरुणाचा मृतदेह अखेर शुक्रवारी रात्री उशिरा, घटनेच्या सुमारे १४ तासांनंतर सापडला आहे. ही घटना शुक्रवारी सकाळी १०:२४ वाजता मुंबई अग्निशमन दलाला कळवण्यात आली होती. त्यानुसार, सकाळी अंदाजे ८:३० वाजता दोन तरुण समुद्रात सुमारे २०० मीटर आत गेले आणि जोरदार प्रवाहात सापडले. दृष्टी मरीनचे जीवरक्षक जितेंद्र तांडेल यांनी अग्निशमन दल येण्यापूर्वीच राजकुमार गोविंद सुब्बा (२२) याला यशस्वीरित्या वाचवले, परंतु विघ्नेश लाटांमध्ये दिसेनासा झाला. अग्निशमन दलाने स्थानिक पोलीस, नागरी कर्मचारी



आणि मच्छीमारांच्या सहकार्याने तात्काळ व्यापक शोधमोहीम सुरू केली. दिवसभर अथक प्रयत्न करूनही विघ्नेश सापडला नाही, अखेर रात्री उशिरा त्याचा मृतदेह हाती लागला.

अधिकाऱ्यांनी असा अंदाज व्यक्त केला आहे की, विलेपार्ले येथील झोपडपट्टीत राहणारे हे दोन्ही तरुण घटनेवेळी दारूच्या नशेत असावेत. दुपारी १:३६ वाजता भरतीमुळे मुंबई अग्निशमन दलाने आपली शोधमोहीम थांबवली होती. अधिकाऱ्यांनी यापूर्वी जनतेला आवाहन केले होते की, बेपत्ता व्यक्ती दिसल्यास जवळच्या पोलीस स्टेशन, बीएमसी किंवा अग्निशमन दलाला कळवावे.

शनिवारी सकाळी मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक मच्छीमार आणि जुहू पोलिसांनी शुक्रवारी रात्री सुमारे १०:३० वाजता विघ्नेशचा मृतदेह यशस्वीरित्या शोधून काढला. त्याला कूपर हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले, जिथे त्याला मृत घोषित करण्यात आले, अशी माहिती रुग्णालयाचे सहायक वैद्यकीय अधिकारी डॉ. निरंजन यांनी दिली. राजकुमार सुब्बा, वेळेवर बचावल्यामुळे त्याची प्रकृती आता स्थिर असल्याचे सांगितले जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com